(अरुण भोले)



॥ श्री सद्गुरु प्रसन्न ॥

ॐ

श्री संत जैरामदास उर्फ लहरी बाबा

विरचित

# समाज जागृती

## लहरी भजनावली

(मराठी)

॥ श्रीगुरुदेव प्रसन्न ॥

श्रीसंत जैरामदास उर्फ लहरी बाबा

विरचित

# 'समाज जागृती'

## लहरी भजानवली

(मराठी)

●

प्रकाशन तिथी

वर्षगाठ : १६ डिसेंबर १९८३

---

किमत २ रु. ५० पैसे

प्रकाशक :
**श्रीसंत जैरामदास उर्फ लहरी महाराज**
प्रबंधक लहरी आश्रम,
मु. पो. कामठा.
तह. गोंदिया, जि. भंडारा (महाराष्ट्र)

卐

प्रथमावृत्ति १०००
द्वितीयावृत्ति २०००
**सर्वाधिकार प्रकाशकाचे स्वाधीन**

卐

मुद्रक :
**शिवशक्ति प्रेस प्रा. लि.**
ग्रेड नाग रोड,
नागपूर–९

# दोन शब्द

पाहुनी जग भुलले भौतिक बाबात ।
म्हणुन कासाविस जीव झाला ।।
विनवितो पांडुरंगा, उचल देवा पडदा जड ज्ञानाचा ।
दे प्रकाश अध्यात्माचा ।।

आजचे जग हे भौतिकवादात अगदी गुंतून गेलेले आहे. एकमेकावर विजये मिळविण्याची ईर्ष्या वाढली आहे. एकमेकांना पराजीत करण्यासाठी घृणात्मक कृत्य आणि शस्त्रांचा प्रयोग आणि उपयोग होत आहे. परंतु ह्या पासून जगात अशांतिच वाढत आहे. व सर्व विश्वातील मानव जातच भयानक शंकेत पछाडलेली आहे. क्षणिक सुख, मोहमाया, अहंकार, यांच्या पाशात अडकून माणसाला माणुसकीचा विसर पडत चालला आहे. आकस्मिक घटना अल्पायुष्य व यमयातना देणारे आजार ह्यांचा पदोपदी अनुभव येत असूनही तो परमेश्वराचे अस्तित्व मानावयास व त्याच्या चरणी लीन होण्यास तयार नाही. आणि स्वतःच स्वतःसाठी दुःखाचे डोंगर रचित आहे.

जगात सुख शांति व रामराज्याचा अनुभव घ्यावयाचा असेल तर, आध्यात्मिक ज्ञानाशिवाय तरणोपाय नाही. ह्याशिवाय कोणतीही शक्ति, कोणतेही शस्त्र परिणामकारक ठरणार नाही. भारत हा आध्यात्मवादाची गुरुकिल्ली आहे. तर भारतीयच ह्या ज्ञानापासून दूर जात आहेत.

येथील महात्म्यांनीच, गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध व निरनिराळ्या रचना जनतेला सन्मार्गात आणण्या करिता केलेल्या आहेत. म्हणून त्यांच्या वचना प्रमाणे, चालणे आमचे तरी मुख्य कर्तव्य आहे. मी ही सरळ भाषेत काही भजने, त्याच उद्देश्यानी तयार केलेली आहेत. भजनांचे गायन करून त्याचा अर्थ आत्मसात करून घ्यावा म्हणजे मी कृतज्ञ झालो.

— जैरामदास



अनन्त श्री लहरी महाराज, कामठा (गोंदिया) महाराष्ट्र.

तुम्ही हो गुरु मेरे कैवल्यदाता । रखूं मैं तुम्हारे चरणों में माथा ।

# अनुक्रमणिका

भजन नंबर


१ तन मन धन अर्पूनी
२ का दूर-दूर रे देवा मजशी राही
३ मन हरि चरणी जडले
४ करंट्या संत काय ओळखी
५ तो सुंदर सावळा मुरारी
६ चुकले नाही कर्म कुणाला
७ मन जागला ध्यान लागला
८ दुष्टाकरिता कितीही झिज ये
९ आता कुठवरी मौज भोगाल रे
१० चोर झाले साव
११ वेळ आली कैसी देवा
१२ सवय मनाची तुटत असे
१३ घडी घडी रुसे
१४ देव माझा मी देशाचा
१५ जडले मन हरि पाई
१६ ज्याचे मनी भरली भक्तीची
१७ लई दिवसापासूनी चालविली
१८ घेई नाम मुखी देवाजीचे
१९ झाला हरि सखा माझा
२० होशी त्याच्या सारखा
२१ आज गुरुचा दिवस
२२ भावाची शिदोरी कर्माचाच
२३ गरिबाच्या देवा तू कुठे
२४ धाव धाव देवा पडले संकट
२५ घेण्या प्रभु नाम


भजन नंबर


२६ ज्याचे ठाई देव झाला असे
२७ गर्वाने बोलु नको कुणा
२८ मानव पाहिजे निर्मळ मनाचा
२९ समोर करता वंदा
३० कैसे धरू धैर्य देवा
३१ असे मनी रे हरिनामाचा छंद
३२ दे ध्यान तु रे इकडे
३३ अरे रामा कुठे लपला
३४ मनमंदिरात माझ्या
३५ मनकरि आत्म्याशी अर्पण
३६ जीवाचा विसावा अेक संत
३७ कंठ भरुनिया येतो
३८ आनंद मनाला झाला
३९ धरा हरी हो धरा हरि
४० मज भेट सख्या गोविंदा
४१ कष्टवूनी शरीर झीजवी
४२ सुपंथाने मी आळवितो
४३ भाव ज्याचा असे हो भोळा
४४ सोहम् मंत्र उच्चारि रे
४५ निर्गुण पद साधणारा
४६ ज्याच्या मुखी राम आला
४७ दुजाचे पाहूनी ऐश्वर्य
४८ विश्वास केला ज्याचेवर
४९ सोड बा या भ्रांतीला
५० जन म्हणती वेडा पिसा

भजन नंबर


५१ वाईट संगती तुझे मन
५२ लुट भक्तीची महीमा
५३ उभा पंढरीचा राणा
५४ प्रभू तुझे स्वरूप सदा
५५ दिन दुबळयाची सेवा नित्य
५६ आउट या हाताच्या पंढरी
५७ प्रभु तुझा माझा संग नित्य
५८ साधका मनाला तु
५९ नको तो भार भूवरती
६० ज्याचे विचार असे उंच
६१ देवा तुझ्यावाचून
६२ धरी तु मनाचा तोल
६३ इथे तुजला सर्व मिळती रे
६४ संतास संत जाणे
६५ माझा प्रेमळ पंढरी राजा
६६ सर्वदा सत्य बोलावे
६७ निशिदिन प्रभूचे नाम स्मरावे
६८ हरिभजनाला लागरे प्राण्या
६९ ज्याचे हृदयी निती धर्म
७० बाबा खरा खोटा पाहे
७१ भक्तांचे करी देव मोल
७२ झाले पोटाचे हे दास
७३ ज्यानी मुखी राम घ्यावा
७४ कळेल कां संताचा भेद
७५ भोग असे हा प्रारब्धाचा
७६ माझा आवडता श्रीरंग
७७ माझा तो आवडता श्रीहरी


भजन नंबर


७८ देवा यारे या झडकरी
७९ देवा दु:ख दु:ख हे इथे मोठे
८० खरे सुख रामभजनी आहे
८१ जो घेणे शिकला जीवन भरी
८२ कुठवरी धाल रे बाबा
८३ भक्ती भावना वैराग्याची
८४ सत्य काम मध्ये राम
८५ भ्रांती मनाची मिटे दर्शनाने
८६ भेटीविन तुझ्या व्यर्थची जीणे
८७ कुणा रामाची गोडी
८८ हारले मी कृष्ण कन्हैयाशी
८९ गाऊ नामाची महीमा
९० लाज ठेवी देवा तु
९१ नाम तारी नाम मारी
९२ उशीर का लावशी रामा
९३ नाच नाचूनी भजन करीन
९४ दिनाचा तु रे कैवारी
९५ पोटासाठी कसे व्यवहार करता
९६ भाव मनाचा निर्मळ करावा
९७ अंधेर अंधेर पसरला आहे
९८ हा मानवाचा जन्म पाहुण्याशी
९९ देवाचे नाव घेता कधी ना
१०० सोडुनि लाज शरम
१०१ कोण कोणाचे दु:ख हरतो
१०२ कागदाचा घोडा
१०३ आरती

# गुरु वंदना

—०—

**भजन** १ (चाल– घडो तुझे दर्शन मजला)

तन मन धन अर्पुनी, आलो तुझ्या द्वारी रे ।
घ्यावे मज गुरुदेवा, आपुले पदरी ।।धृ०।।

नको देऊ धन मान, नको देऊ मुक्ति ।
सदोदीत तुझी माझी, घडू दे रे प्रिती ।
वास तुझा राहो देवा, माझिया अंतरी ।। १ ।।

नको मज रिद्धि सिद्धी, नको योग उपाधी ।
नित्य ध्यान असो देवा, ऐसी दे रे बुद्धी ।
तुझ्या नामाविन देवा, रुचेना क्षणभरी ।। २ ।।

नको मज युक्ति, शक्ति, नको स्वर्ग सुख ।
नेहमी तुझ्या सत संगाची, राहो मज भूख ।
लागू दे रे देवा तुझ्या, चरणाची धळी ।। ३ ।।

नको मज व्रत नेम, नको तीर्थ यात्रा ।
ठाव देई चरणापाशी, तु रे या कुपात्रा ।
जैरामाला आता देवा, ठेवी चरणावरी ।। ४ ।।

**भजन २ (चाल– भेटेन अनु महीण्याची )**

का दूर दूर रे देवा मजशी राही ।
कसे नवल माझे तू पाही ।। धृ० ।।

का आढे वेढे, मजशी तू रे घेशी ।
कशी दया न ये मज प्रती ।
(चाल) हुर हुर मनाला वाटे ।
धैर्य हे मनाचे सुटे ।
मम जीवाला शांति नच ही राही ।। १ ।।

आता कोणाशी जाऊं मी रे शरण ।
सांगू हे कुणाला गाऱ्हाणे ।
(चाल) डोळयातून अश्रु वाही ।
अगावरी काटे येई ।
सुचे नारे मजला आता कांही ।। २ ।।

जर जर झाली माझी वा रे काया ।
धाव रे पंढरी राया ।
(चाल) तुझ्या वाचुन साथी कोण ।
मज देईल शांतवण ।
ही हाक तू माझी कानी घेई ।। ३ ।।

ही अब्रु रे माझी जाते आहे ।
धाऊन येई लवलाहे ।
(चाल) उरला हा जीव तव भेटी ।
जैराम म्हणे जगजेठी ।
वाचवी तू मजला माया डोही ।। ४ ।।

**भजन ३ (चाल– धुंद ध्यानी भरली )**

मन हरी चरणी जडले की हरी चरणी जडले ।
सारे भ्रम लयासी गेले ।।धृ०।।

(चाल) काय सांगावा तिथला आनंद ।
जिकडे तिकडे तो गोविंद ।
मी तू पण हरले की मी तूं पण हरले ।। १ ।।

(चाल) विश्वची झाले माझे घर ।
सर्व जीव कुटूंब परीवार ।
संचीत फळा आले की संचीत फळा आले ।। २ ।।

(चाल) रंग रंगात पंढरी भरला ।
त्या विण दूजा कुणी न दिसला ।
जिव शिव एक झाले की शिव एक झाले ।। ३ ।।

(चाल) माझा मीच असे साक्षी ।
बोलणे चालणे माझे मजशी ।
जैराम स्वरूपी मिळाले की, स्वरूपी मिळाले ।। ४ ।।

**भजन ४ (चाल– लाडक्या पुंडलिका भेटी )**

करंट्या, संत काय ओळखी ।
असे ती त्याची मूढ बुद्धि ।। धृ० ।।

असे परजिवा द्वेश भाव ।
कसे कळेल त्याचे ठाव ।
(चाल) करीत से ते काम खोटे ।
मिळेल काय त्याला सद्गती ।। १ ।।

मन असे हे धन द्रव्यात ।
नाम न येई कधी मुखात ।
(चाल) स्वार्था करीता झटे दिनरात ।
कशी येईल प्रचिती ॥ २ ॥

विचरा न केला पाप पुण्याचा ।
जन्म व्यर्थ गेला त्याचा ।
(चाल) नाद असे मोह मायेचा ।
भरतो, असे भूमी वरती ॥ ३ ॥

प्रभु जरी आले, त्याचे समोर ।
जैरामदास म्हणे, का कळणार ।
(चाल) वंशी जाई तेव्हा कळणार ।
इतरांना काय ते शोभती ॥ ४ ॥

भजन ५ (चाल– तेरा सुंदर मुखडा )

तो सुंदर सावळा मुरारी मज आवडे निरंतरी ।
त्याविण सुख नाही ॥धृ०॥
(चाल) होउनी आवडी मोठी, पाहण्या त्या जगजेठी ।
हृदयांत कंप दाटे, नेत्रात धारा सुटे ।
कधी भेट देईल गिरीधारी, हीच चिंता भारी ॥१॥
(चाल) क्षणमात्र करमे ना येई न झोप नयना ।
मनी न थोडी चैना, कांही मन सुचे ना ।
दृढ भाव धरुनी अंतरी, सोडली ममता सारी ॥२॥
(चाल) संकट जरी आले किती, त्याची न कांही गिन्ती ।
जन रुसो माझे प्रति, पर्वा नाही नयाची ।
छळ झाले किती तरी सोडी ना मुरारी ॥३॥

(चाल) केला हा मन संकल्प, येवो न कधी विकल्प ।
जैरामाची हीच भूक, देवाशी हीच हाक ।
आस माझी पूर्ण करी, पामराशी तारी ॥४॥

भजन ६ (चाल– बैठे हैं तेरा ध्यान लगाये )

चुकले नाही कर्म कुणाला, देव मुनी सर्वाला ॥धृ०॥
हरिशचंद्र तारा राणी, वाहे डोमा घरी पाणी ।
किती वीर ते पांडव पाहा, त्रास किती झाला ॥ १ ॥
पाहा कृष्णा पारध्याचे बाणाने वध झाला त्याचा ।
होता जरी तो अंतर्यामी, भोगने आले त्याला ॥ २ ॥
कर्म क्षेत्र नांव देहाचे, फळ मिळते संचीताचे ।
आनंदाने सोशित जावे, सोडू नये धैर्याला ॥ ३ ॥
किती तरी संकट आले, धर्म विमुख न झाले ।
जैराम म्हणे लिहले संचिती, चुकले बा नाही कुणाला ॥४॥

भजन ७ (चाल– मन डोले मेरा तन डोले )

मन जागला, ध्यान लागला, त्या गुरुदेव कृपेने
ते गेले मी तू पणे ॥धृ०॥
(चाल) चित्त चिंतवन निर्मल वनी, ज्योत जागली नयनी ।
प्रगटली ती मुर्ती सावळी, माझे हृदयस्थानी ।
बोळवण झाली मी तू पणाची, त्या गुरुदेव कृपेने ॥१॥
(चाल) जिकडे पाहतो तिकडे हरी हा, भरला ठाई ठाई ।
सुध बुध माझी सर्वच गेली, भान राहीले नाही ।
ब्रह्मानंदे वाजली टाळी, त्या गुरुदेव कृपेने,
ते गेले मी तू पणे ॥२॥

(चाल) मधूर मधूर मुरलीचा हा सुर, येई कानावरी ।
रुण झुण, रुण झुण, वाद्य वाजती वीणा एकतारी ।
जीव दंगला, जीव रंगला, स्वरूप पाहूनी,
ते गेले मी तू पणे ॥ ३ ॥

(चाल) गुरु कृपेचे अंजन घालून, गेलो निरंजन पूरी ।
जैरामदास म्हणे, चुकली ती, जन्म मृत्युची फेरी ।
येणे जाणे चुकले, बंधन तुटले त्या गुरु कृपेने ॥ ४ ॥

भजन ८ (चाल– पोटा पुरते मला पाहिजे )

दुष्टा करिता कितीही झिजावे, येई न तुमच्या कामी ।
वेळ प्रसंगी साथ न देई, जाई तो निघुनी ॥धृ०॥

जरी कराल पूजन त्याचे, सुटे न त्याची चाल ।
त्या करीता जरी प्राण दिला, करील न त्याचे मोल ।
असो किती हा ब्रह्मज्ञानी, सुख मिळे ना जनी ॥ १ ॥

ड़ोक्यावरती विस्तव धरला, त्याला तो जाळणार ।
कामी पुरुष पुजेत बसला, ध्यान कसे लागणार ।
अंगी आहे दुर्गुण सारे, जड़े न चित्त नामी ॥ २ ॥

निंदकाचे जरी पाय धरले, सोडी न अपुले काम ।
प्रेम केले जरी विंचवाशी, भितीशिवाय न विश्राम ।
दारुड्याला दूध पाजीले, आवडे नाही मनी ॥ ३ ॥

मांस खाणाऱ्यास गोड दिले, मिळे न त्याला स्वाद ।
मूळ स्वभाव ज्यांचे असले, जाई न त्याचा नाद ।
जैरामदास म्हणे रे बाबा, व्यवहार करा दूरुनी ॥ ४ ॥

भजन ९ (चाल– अब काहे को धूम मचाते हो )

आता कुठवरी मौज भोगाल रे, दुःख देवूनी दिन दुबळयाशी ।
घेईल खबर देव तुम्हासी ॥धृ०॥

(चाल) सोडूनी निती मर्यादा, दावीसी आपला थोर पणा ।
कीव नाही तुझे मनी रे, करीती जीवासी यातना ।
भूलूनिया सतकर्माला, वाईट मार्ग धरलाशी ॥१॥

(चाल) पोटाची ही फिक्र तुला रे, लक्ष न्याय अन्यायाचा ।
मिळो द्रव्य कुणा कडोनी, मनी व्यवहार कुटनितीचा ।
विसरुनिया माणुसकीला, जगी रावण झालाशी ॥२॥

(चाल) तुझ्या दृष्टी साधु संत, देव भक्ती वाईट दिसे ।
नेहमी त्याच्याशी वैर ठऊनी, त्रास त्यांना तू देत असे ।
गर्वाच्या थाटात राहूनी, जीवनाची माती करशी ॥३॥

(चाल) जैराम म्हणे सावध हो गडयारे, सोड ऐसे गर्व गुमान ।
अंतकाळाचा करी विचार, पुढे तुला रे दुःख महान ।
रावणासारखे शूर वीर ते, मुकले राम बाणासी ॥४॥

भजन १० (चाल– मेरे मनकी गंगा )

चोर झाले साव आणि साव झाले चोर ।
पाप वर्तले भूवरी, अती घन घोर ॥धृ०॥

(चाल) परमार्थी जीव, चहूदिशा, फिरती त्राही त्राही होऊनी ।
चिंतातुर अहंनीशी झाले, कोणी न ऐके गाऱ्हाणी ।
अन्यायाचा कळवळा मनी, कैसे व्हावे पार ॥१॥

(चाल) धर्मनिती देव पूजा, नियम सर्व चाललें ।
मनोवृत्ती मानवाची, सर्व ही भ्रष्ट झाले ।
संग सोडला निसर्गाने, दुर्घटना होती फार ॥२॥

(चाल) माता पिता आणि बंधु सख्याचा, प्रेम कोणावरी नाही ।
स्वार्था मध्ये सर्व विसरले, दया धर्म मनी नाही ।
द्वेष भाव भरलें अंगी, ना सत्य विचार ॥३॥

(चाल) जैराम म्हणे सावध व्हावे, खोट्या नाट्या कामाशी ।
सत्कार्यासी द्यावे लक्ष, नाहीतर होईल दगा ।
गेली संधी पुन्हा मिळेना, करा हा विचार ॥४॥

**भजन ११ (चाल– नाच नाचूनी अती मी दमले )**

वेळ आली कैसी देवा, जिवा कान विसावा ।
सांग तुची आता मज, कैसे जिवित रहावा ॥धृ०॥

प्रेम नाही भाव नाही, दया नाही मनी कांही ।
व्यवहार पाहता दु:ख वाटे द्वेष भरले जनी ।
कुणा सांगू कर्म कहानी, तुज वाचून माधवा ॥१॥

मन भ्रमणी पडले, हिंडे चहू दिशा ।
ज्याच्या मी विश्वास केला, त्याने टाकीला फासा ।
धर्म नाही राहीले थोडे, कुणाचा संग घ्यावा ॥२॥

हे अन्याय अत्याचार, कुठवरी सहावे ।
तुजपासी न्याय कसा, देव कसा म्हणावे ।
भूवरी देव आहे, तर धावूनी यावा ॥३॥

म्हणे जैराम तुज पत्र लिहतो देव शेवटचा ।
देहात प्राण आहे निर्णय घ्यावे तुम्ही आमुचा ।
जरी सुखी करणे जगी, तर जीवीत ठेवावा ॥४॥

**भजन १२ (चाल– आपसे हमको बिछडे हुये )**

सवय मनाची तुटत असे, नेहमी सतसंग केल्यानी ।
सत वचने वळत असे, मन हे देवाचे चरणी । धृ०॥

(चाल) मन हा भटके जिकडे तिकडे, तेव्हा ठेवी आत्मा साक्षी ।
चित्त, बुद्धी स्थिर करावे, अनुभव हा लावूनीं लक्षी ।
उडी घालावी विवेकानी, देह अभिमान विसरोनी ॥१॥

(चाल) जागा आपुले आसनावरी, भटकत पाहू नका बाहेरी ।
समजुत घालावी नित्य मनाची, जाई तू रे आत्ममंदी ।
तेव्हा मिळे रे सुख जीवनी, ओळची आत्मा तत्क्षणी॥२॥

(चाल) जागृत स्वप्नी तेव्हा जावे, तेव्हा मन हा रंग दावी ।
नटकट नाटक उभे करी हा, आपुलेच हा खेळ दावी ।
संकल्प विकल्प याचे कडे, अडतसे हा देव ध्यानी ॥३॥

(चाल) ऐकूनीया अनहद नाद, स्वानंदाचा घेई आनंद ।
मना वाटे मोठी लाज, सुटला विषयाचा तो छंद ।
असा झाला हा सवगडी, भ्रमना भ्रांती सोडूनी ॥४॥

(चाल) पाठींबा घ्यावा मनाचा, सुख पाहण्या जीवनाचा ।
जैराम म्हणे या पासुनी, फासा तुटे जन्म मरणाचा ।
भजन करावे गाढ वाचे, मन हे नियंत्रण करोनी ॥५॥

भजन १३ (चाल– ठाई ठाई बसे )

घडी घडी रुसे, लोकापाई फसे मनराया ।
तुझ्यापायी हो जळली रे काया ॥धृ०॥

(चाल) अससी तू ही रे मोठा हठीला ।
रंग दावसी नित्य आपूला ।
सुचेना या जिवा कळेना या ठावा, उद्धराया ॥१॥

(चाल) कधी नेतो तू मोक्षाचे ठायी ।
जन्म मृत्यूचे बंधन त्या पायी ।
इंद्रिये नृपती सर्व तूझे हाती, "गजराया" ।२॥

(चाल) वासना ओढाल तुझीच ताई।
आशा तृष्णाशी संगत ठेवी।
गण गोत असा, फिरावे चहू दिशा, अशी माया ॥३॥
(चाल) मना तू रे देवाचा देव।
घेई जैरामाची जरा किव।
तुझ्या प्रसन्नतेने, तुटती जीव पाळणे, देवराया ॥४॥

भजन १४ (चाल– गुण दोष हमारे ना )

देश माझा मी देशाचा, भाव मनी राहो देवा।
जरी प्राण निघे या देहातूनी, विसर न पडो जनसेवा ॥धृ०॥
येवो किती तरी संकटे, धैर्य मनाचा न सुटो।
झिजो देह हा सत् कार्याशी, सर्व जीवा प्रेम जडो।
हेची मागणे तुझसी असे, चरणी देई तव ठावा ॥१॥
सर्वांचे सुख पाहू दे ड़ोळा, कुणी दुःखी ना दिसे कधी।
द्वेष भाव अहंकार, तिळमात्र न येवो ध्यानी।
सत्य अहिंसा प्रेम करुणा, सर्व जिव सुखी व्हावा ॥२॥
दयाभाव निती धर्मांचे, कार्य घड़ो या पामराशी।
नाम राहो मुखी तुझे, मागणे ऋषीकेशी।
तुझ्या रंगाचा छंद जडू दे, ऐसी बुद्धि मज द्यावा ॥३॥
जेराम म्हणे नको देवा, मज धन, द्रव्य सन्मान।
जन्मोजन्मी तुझे चरण, दिसु दे नित्य मम।
बाळपणापासून हा छंद, देह सत् कार्याशी लावा ॥४॥

भजन १५ (चाल– मधूर मधुर मुरली कन्हैया ची वाजतसे )

जडले मन हरी पायी हरी पायी।
देहाचे भान राहले नाही ॥धृ०॥

(चाल) जीव झाला कासावीस।
लागला ब्रह्मानंदी ध्यास।
सुचेना काही, सुचेना काही ॥ १ ॥

(चाल) देह भान विसरल्या।
सकल इंद्रिया एक झाल्या।
वदन कवळ घेती ही, देती ही ॥ २ ॥

(चाल) मी तू पणाची बोळवण।
आलींगन देती प्रेमान।
लागली देहाची मोहनी, हरीची मोहनी ॥ ३ ॥

(चाल) हरी झाला त्यांचा संगी।
त्या आनंदात सदा रंगी।
ठायी ठायी हरी पाही, हरी पाही ॥ ४ ॥

(चाल) जैराम म्हणे लागले वेड।
घेतला ज्याने तो आनंद।
अनुभवाविण कळत नाही, कळत नाही ॥ ५ ॥

भजन १६ (चाल– भये भंजना वंदना सुन हमारी)

ज्याचे मनी भरली, भक्तिची ही धुन्द।
मग काय शोभा, स्वर्ग सुख आनन्द ॥धृ०॥
तन, मन, धन, सर्व अर्पण केले।
मग त्याच्यासाठी जगी काय उरले।
त्याचा पाठीराखा, तो झाला गोविंद ॥ १ ॥
संसार सारा मिथ्या वाटू लागे।
जीव या बंधनाची, नित्य वाट त्यागे।
परमानंदाचा घेई तो स्वानंद ॥ २ ॥

सर्वाठायी पाही एक पांडुरंग।
अहर्निशी राही त्या नादात दंग।
गेली ती उपाधी, झाला ब्रह्मानंद ॥ ३ ॥
भासु लागे त्याला, विश्व हेची घर।
सर्व प्राणी दिसे, कुटुम्ब परिवार।
जैरामाशी राहीली नाही सुधबुध ॥ ४ ॥

भजन १७ (चाल– एक परदेशी मेरा दिल ले गया )

लई दिवसापासून तूने चालविली माळ।
अंतरीचे कपट तुझ्या नाही निघाल ॥धृ०॥
(चाल) ब्रह्म ज्ञानाच्या तू गोष्टी सांगसी।
पर आत्माची दया न घेशी।
भोळ्या भाविकाशी फसवून होशी हुशार ॥ १॥
(चाल) नाकापासून शेंडीपर्यंत चंदन लाविशी।
आत्मज्ञानी आह्रो म्हणून सांगशी सर्वाशी।
कींव नाही तुझे मनी, विषयाचा चाळ ॥ २ ॥
(चाल) दिवसभर बसुनी कुटतो टाळ।
काम धंद्याचा तुला येतो रे कंटाळ।
पर द्रव्यावरी राही नजर ॥ ३ ॥
(चाल) लोका सांगे मी आह्रो ब्रह्मचारी।
भटके मन तुझे पाहूनी पर नारी।
असे कसे तुझे बा ज्ञान हे खरं ॥ ४ ॥
(चाल) जैरामदास म्हणे सोड सोंग धतूरे।
कर्म मानवाचे करीत जा सारे।
दया भाव मनी ठेव, नासेल हा मळ ॥ ५ ॥

**भजन १८ (चाल- मुर्गा मुर्गी प्यार करे )**

घेई नाम मुखी देवाजीचे, परि कर्म करी राक्षसाचे ।।धृ०।।
विद्वानांनो सांगा कुणीतरी, या मार्गानें तरले का ।
परक्या जिवाला त्रास देउनी मिळेल का दर्शन देवाचे ।।१।।
नित्य करीं घुसखोरी धंदे, दिन दुबळ्यावर टाकी फंदे ।
लक्ष असे वाईट कामी, स्मरण करी नित्य वेदाचे ।।२।।
अहर्निशी वाजवी टाळ, अंगी असे दुर्गुण मळ ।
वारी करी नित्य पंढरीची, होई का दर्शन विठ्ठलाचे ।।३।।
देतो त्रास आईबापास, मेल्यावरी अस्थि नेई काशीस ।
ठेवी भात घरावरती, काक द्वाप बोले वाचे ।।४।।
जैराम म्हणे मनी नाही भाव, दया शांती विन कैसा मिळे देव ।
आचरणाविन साध्य न होई, अनुभव घडे कसे देवाचे ।।५।।

**भजन १९ (चाल- गेला हरी कुण्या गावा )**

झाला हरी माझा सखा, दुजा नाही त्या सारखा ।
केली मजवरी कृपा, तो दयाळू दिनाचा कनवाळू ।।धृ०।।
(चाल) सर्व झाला तो हरी, करमेना त्याविण क्षणभरी ।
लक्ष न लागे कामावरी, बघतो तिकडे श्रीहरी ।।१।।तो.
(चाल) अहर्निशी असे त्याचा छन्द, तोच असे माझा आनंद ।
गेला मायेचा नाद, मिळला ब्रह्मानंदी स्वाद ।।२।। तो.
(चाल) अन्ती दिसे नाही कोणा, एका देवा वाचून ।
विश्व भरले माझे नयनी, माझा मीच दिसे जनी ।।३।।तो.
(चाल) जैराम म्हणे केली कृपा, केला आपल्या सारखा ।
तोडण्या चाऱ्याशीच्या खपा, वर्णू किती महिमा बापा ।४।

भजन २० (चाल– गेला हरी कुण्या गावा )

होशी त्याच्या सारखा, तेव्हा होईल देव तुझा सखा ।
नाहीतर जाशील तू नरका, ऐकून घेई घेई तू प्राण्या ॥धृ०॥
(चाल) वाचूनी काढ धर्मग्रंथ, चाल तू नित्य सुपंथ ।
राहू नको तूं रे भ्रमात मानुनी घे तु हे सत्य ।
तेव्हा देईल प्रभु तुज साथ ॥१॥ ऐकून घेई....
(चाल) तत्वात तत्व मिळवून घ्यावे, शिवामध्ये जीव घालावे ।
असे इंद्रियास वळण द्यावे, कामक्रोधाशी मारावे ।
तरीच पहावे ते पद ॥२॥ ऐकून घेई ....
(चाल) संकल्प मनाचा तू कर, दृढभाव हृदयी धर ।
दया कर सर्व जीवावरी, सर्वांमानी तू ईश्वर ।
तेव्हा होईल तुझा उद्धार ॥३॥ ऐकून घेई...
(चाल) जैराम म्हणे किती करीशी तू पूजा ।
मनी आहे भाव तुझा दुजा, कसा पावेल राम राजा ।
कशी मिळेल तुला रजा ॥४॥ ऐकून घेई....

## गुरु पौर्णिमेचा दिवस

भजन २१ (चाल– गेला हरी कुण्या गांवा)

आज गुरुचा दिवस, सर्वांच्या मनी आहे उल्हास ।
सुटो जन्म मृत्यूचा फास, सर्वांस मनी हीच आहे आस ॥धृ०॥
जिथे–तिथे भरला आनंद, नयनी पाहू गोविंद ।
असा नेहमी राहो छंद, या करीता आलो जन्मास ॥१॥
घडो नेहमी त्यांची सेवा, हेच मागणे तुज देवा ।
कधी नाही विसर व्हावा, जन्मोजन्मी राहो त्याचा दास ॥२॥

आज्ञा पाळा गुरुची थोरवी पाहू लिलेची ।
करू भव रोग नाश, नाचू त्यांच्या त्या रंगात ॥३॥
खल करी आम्हावरी घात, ठेवू शब्द लक्षांत ।
प्राण जावो तरी, राहो सत्य मात ॥४॥
जैराम म्हणे गुरुची वाणी, नित्य घेऊ आपुले कानी ।
उतरवू आपुले जीवनी, हीच आमुची आस ॥५॥

भजन २२ (चाल– देहाची तिजोरी भक्तिचाच ठेवा )

भावाची शिदोरी, कर्माचाच ठेवा ।
घेऊन आलो द्वारी, तुझ्या घेऊन आलो द्वारी ॥धृ०॥
दिन दुबळ्याची भेट, स्विकार करावी ।
आनंदाने प्रेमाने गोड करून घ्यावी ।
देण्यासाठी मजपाशी तुला, कांही नाही ॥१॥
धन नाहीं द्रव्य नाही, नाही बुद्धि भक्ति ।
अगी सर्व भरली आहे कुकर्माची शक्ति ।
देवा तुजविण मला आता कोण तारी ॥२॥
अनंत जन्माचा भिकारी मी देवा ।
आता तरी तुम्ही मला पदरी घ्यावा ।
विसर न पडो मला तुझ्या नामाचा हरी ॥३॥
जैरामदास म्हणे माझी ही विनंती ।
तुजविण मला देवा कोण देई शांती ।
मागणे कांही नाही संग तुझा दे हरी ॥४॥

भजन २३ (चाल–निघू दे दिवस मंगल तो)

गरीबाच्या देवा तू कुठ जाऊनी लपलाशी ।
कशी ना देना ये तुज, एवढा तू निष्ठूर झालासी ॥धृ०॥

किती अधर्म वाढला, मानव झाल सीमापार ।
धरी ना विचार मनी थोडा, कर्म करीतो असूर ।
सोडली इमानदारी सारी, शांतता नाही मनाशी ॥१॥
पसरली घुसखोरी ही, सत्याचा थारा लागत नाही ।
आता खोट्याचा बोलबाला, खरा झाला त्राही त्राही ।
कसे हे नवल पाहतोशी, कीव ना रे तूजपाशी-॥२॥
जिकडे पाहावे तिकडे, आपसी होतात भांडण ।
लहान थोरांचे न मानी, सांगे तो आपुला अभीमान ।
कळे ना धर्मनिती ही, समझे शहाणा आपणाशी ॥३॥
म्हणे जैराम झडकरी ये, वाचविण्या बुडल्या जनाला ।
येऊनी दे धैर्य सर्वांना, सुखी करण्या जिवनाला ।
ऐक ही दिनाची गाऱ्हाणी, जडजिवा तारण्याशी ॥४॥

भजन २४ (चाल– आवो बच्चो तुम्हे दिखाये )

धाव धाव देवा पडले संकट भारी ।
तुझ्या वाचुनी कोणी नाही, तूच एक कैवारी ।।धृ०॥
तूच जन्म देणारा सर्वांचा आई बाप ।
तुझ्या वाचुनी कोण हरेल देवा हा त्रीताप ।
तूच माझ्या जीवन नौकेचा नावाडी ॥१॥
निर्धनाचा बळी तूच रंजल्या गांजल्या वाली तू ।
विश्वाचा अधिकारी तूच, भरला ठाई ठाई तू ।
अंत न लागे कोणा तुझा, हे मोहन मुरली धारी ॥२॥
उद्धार केला तुच गजाचा, गारोबाचे पोर जागले ।
जैराम म्हणे तुझी महिमा, गाऊ किती माझ्या वाचे ।
वेळ नको लाऊ प्रभु यरे, सर्वांचा धैर्य धारी ॥३॥

भजन २५ (चाल : प्राण्या क्षणभरी श्रीराम भजरे. . . )

घेण्या प्रभु नाम, दृढ भाव धरि रे ॥धृ०॥

क्षणोक्षणी मनावरी, नियंत्रण करि रे ।
नित्य सतसंगाचा तू, लाव मनी छंद रे ॥ १ ॥

त्याग विषयाचा करुनी, भक्ति पंथा लागी रे ।
कर्म योग, ज्ञान योग, यासी तू साथी रे ॥ २ ॥

मना संकल्प करोनी, विकल्पासी त्यजावे ।
वेळो वेळी नामस्मरणी, सावध तू राहावे ॥ ३ ॥

काम क्रोध, लोभ, दंभ, ठाईच मारावे ।
आशा तृष्णा, मनसाला, नेहमी तु जिंकी रे ॥ ४ ॥

चित्त शुद्ध करुनीया भजनाशी बैसावे ।
देह अभिमान सोडून, शून्य शिखरी जाई रे ॥ ५ ॥

जैरामदास म्हणे बारे, सावध तू होई रे ।
आत्म चिंतनी जागृत होऊनी ब्रह्मरस पिई रे ॥ ६ ॥

भजन २६ (चाल : भये भंजना वंदना सुन हमारी )

ज्याचेसाठी देव झाला असे दास
सर्व कामे करी, कशाला हा त्रास ॥ धृ० ॥

जनीचे सवे तो दळू कांडू लागे ।
भक्ताचे ते त्रास स्वयं सर्व सोसे ।
अहर्निशी संग देतसे तो त्यास ॥ १ ॥

चोख्याचे ते ढोर, नित्य ओढू लागे ।
सावत्याचे मळ्यात, पाणी देऊ लागे ।
प्राशन केले मिराचे सारे ते विष ॥ २ ॥

दृढभाव धरूनी, जो चिंतन करी ।
त्याचे दु:ख संकट, क्षणात निवारी ।
असा तो कनवाळू, राखी तो ब्रिदास ॥३॥

सोडून कल्पना, धरावे ते चरण ।
बहू लीन होऊनी, आळवा भगवान ।
जैरामदास म्हणे, ठेवा हीच आस ॥४॥

भजन २७ (चाल : आने से उनके आये बहार)

गर्वाने बोलू नको कुणा, जीव हा दो दिवस पाहुणा ।
जगामध्ये आला रे, कर जीवन उद्धार ॥धृ०॥

(चाल) जन्मासी येऊनी तू, धन द्रव्यामध्ये भुलला रे ।
सोडूनी ते स्वहीत, आडमार्गी तू चालला रे ।
घेतली तू कुसंगत, केला ना विचार ॥१॥

(चाल) एक एक श्वास आहे, हा रे बहु मोलाचा ।
व्यर्थ खोवू नकोरे तू,होईल घात तुझ्या जीवनाचा ।
सत्याला पाहून चाल, श्वास गेला न येणार ॥२॥

(चाल) कुणाचा हा महाल, कुणाचे राहिले थोरपण ।
कुणाची रात्रदिवस, कोण्या दिवशी काय होणार ।
घरट्यातूनी पक्षी हा केव्हा उडणार ॥३॥

(चाल) क्षणी क्षणी करी तू, या उपदेशाचे ते ध्यान ।
न ऐकलेस रे तू, पुढे आहे नरकाची खाण ।
सांगे जैराम सावध हो, बोलाचा करू नको फोल ॥४॥

भजन २८ (चाल : तेरे प्यार का आसरा)

मानव पाहिजे निर्मळ मनाचा ।
तेव्हा भेट देतो सखा पंढरीचा ।।ध्रृ०।।

(चाल) एक तत्व दृढभाव हृदयी धरूनी ।
लोभ अहंकाराशी सर्व त्यजूनी ।
जनी व्यवहार करी, सत्य पणाचा ।।१।।

(चाल) निष्कपटी निर्व्यसनी निसंग राहूनी ।
परमार्थ करीतसे प्रपंच साधूनी ।
तेव्हा प्रेमी होतो सर्व जीवाचा ।।२।।

(चाल) दुःखी जीवा पाहोनी, अश्रु ड़ोळा येती ।
सेवेसाठी करीतसे स्वदेहाची माती ।
नाही ज्याचे अंगी भाव मान पानाचा ।।३।।

(चाल) संतसंगविण व्यर्थ वेळ न टाळी ।
प्रभु चिंतनी मन सदा सर्वकाळी ।
द्वेषभाव सोडूनी मित्र हा जगाचा ।।४।।

(चाल) जैरामदास म्हणे, ऐसे भक्तिचे लक्षण ।
चौऱ्याशीच्या घडामोड़ी तुटति तक्षण ।
मागे किर्ती राहि पुढे, द्वार हा मुक्तिचा ।।५।।

भजन २९ (चाल : धून ध्यानी भरली)

समोर करता वंदा आणि मागे करता निंदा ।
कसा पावेल गोविंदा ।।ध्रृ०।।
साधु संताचे चरण धरिता ।
त्यांच्या संगे कपट करीता ।
मन असे गंदा की मन असे गंदा ।।१।।

बोलता एक करता दुजे ।
पापाचे ते घेता शिरी ओझे ।
जीव झाला चवचिंदा की झाला चवचिंदा ॥ २ ॥

अहर्निशी स्वार्थामध्ये ध्यान ।
आयुष्य हे गेले निघून ।
नामाचा झाला चेंदा की नामाचा झाला चेंदा ॥ ३ ॥

वाईट कामात शरीर थकले ।
ज्ञान, ध्यान हे सर्व विसरले ।
जीवनी पडला फंदा की जीवनी पडला फंदा ॥ ४ ॥

जैराम म्हणे करतो ते बोल ।
तेव्हा तुझे होईल मोल ।
सारा खोटा धंदा की सारा खोटा धंदा ॥ ५ ॥

भजन ३० (चाल : दर्शन दो घनश्याम नाथ मोरी अंखियां)

कैसे धैर्य धरु देवा, अन्यायाच्या दश दीशा ।
येत नाही किव कोणा, कैसे दुःख सोसावे धृ० ॥

पाखंडी छल आणि कपटी, दुःख देती नेहमी नेहमी ।
थोडीही नाही चैन मनी या, क्षणमात्र ना विसावा ।
झाला जर जर देह प्रभू रे, आता सांगु कुणा ॥ १ ॥

सोडू लागले न्याय निती, अन्यायासी करीती प्रीती ।
दुराचार यांचा तो पाहूनी, नाटकी रुप कसे हे करती ।
पापाचे पुण्याचे भय ना, जैसे मनी येई करती ॥ २ ॥

पाहूनी याचा चाळा सुचेना, वाहती नैनी अश्रुधारा।
कोणाचे हो आश्रय घ्यावे, कोणाला हे काय सांगावे।
बुद्धी आता काय करीना, मार्ग मला दावा ॥ ३ ॥
म्हणे जैराम एक भरोसा, देवा आहे तुझीया चरणी।
येऊनी दे रे तू सांत्वना, जीव हा झाला त्राही त्राही।
अर्ज ऐक हे दिन दयाळा, करुणा कानी घे ॥ ४ ॥

भजन २१ (चाल– भेटेन नऊ महिन्यानी)

असे मनी रे हरी नामाचा छंद ।
पाही सर्व ठायी गोविंद ॥ धृ० ॥
असे दया रे बहुत ज्याचे हृदयी ।
तिळमात्र द्वेष ना राही ।
(चाल) अशी स्थिरावली ज्याची बुद्धी ।
प्रपंचाची गेली उपाधी ।
नेहमी रे परोपकाराचा नाद ॥ १ ॥
जे जे संकटे याचेवरी येती ।
प्रेमाने सोसून घेती ।
(चाल) सोडती ना थोडे धैर्य ।
मृत्युचे न त्यांना भय ।
दृढभाव तो धरून भजी परमानंद ॥ २ ॥
देवाचरणी अर्पुनी अपुला देह
सर्वा जीवा ठेवी दयाभाव ।
(चाल) स्वावलंबी बनवी जीवन ।
सत्कर्मी ठेवी हे ध्यान ।
असत्य कामाचा करी नेहमी प्रबंध ३ ॥

परद्रव्याशी पाही माती समान ।
निस्य करी नामस्मरण ।
(चाल) ना ठेवी देह अभिमान ।
सर्वांशी, पाही समान ।
खाण्यापिण्याची नाही यांना शुद्द ॥४॥
जैराम म्हणे ऐसे ज्याचे लक्षण ।
जाती हीच किर्ती ठेवून ।
तनु त्यागीता किर्ती राही ।
जींवंतपणी मिळवी मुक्ति आनंद ॥५॥

भजन ३२ (चाल : घे दुध माधवा रे . . . .)

दे ध्यान तू रे इकडे, वेळ खोवू नको रे ।
किती दिवस मागे गेले ध्यान त्यावर तू न दिधले ॥धृ०॥
गप्पामधे राहूनी आयुष्याची माती केली ।
विचार नाही केला, श्वास सारे गमाविले ॥१॥
माया ही रे मोहनी, भुलवी संसार वनी ।
संगती पासून हिच्या कोणी न उद्धरिले ॥२॥
ठगनी असे ही मोठी, अपुलेच रंग दावी ।
छंदी हिच्या जो लागे, बंदिस्त हिने केले ॥३॥
नको भुलु हिच्या रंगी जैराम सांगे तुला ।
हिच्या पासूनी जे सुटले, ते ब्रह्मानंदी झाले ॥४॥

भजन ३३ (चाल : प्रभु हा खेळ दुनियेचा असा हा . . . .)

अरे रामा कुठे लपला, कैसी येईना दैना तुजला ।
असा निष्ठूर का झाला, उशीर का लावी येण्याला ॥धृ०॥

फजिती होत आहे रे, मिळेना रे इथे शांती ।
लोक विद्रोही हे सारे, भिती नित्य दावीती ।
टाकुनी खोटे जाळे हे, वर्चस्व दावीती अपुला ॥१॥

झाला देह जर्जर, लक्ष ना लागत कामी ।
जीवाला वाटे हुरहुर, राहते चिंता नेहमी ।
असा व्यभीचार पाहूनी, येतसे यांचा कळवळा ॥२॥

कुठवरी भांडवलशाही, प्रभु रे चाल देणार ।
पाहसी नवल कसले रे, काळजी कां तुला नाही ।
आता रे धैर्य ना अंगी, वेळ का लावुनी बसला ॥३॥

म्हणे जैराम अन्याय, कुठवरी हा रे सोसावा ।
तुझ्या वाचून विसावा, जगी कोणी आम्हा घ्यावा ।
धाऊनी ये तू झडकरी, राखण्या आपुल्या वचना ॥४॥

भजन ३४ (चाल : या झोपडीत माझ्या . . .)

मन मंदिरात माझ्या, येऊनी बैस आता ॥धृ०॥

दुरुनी तूची बघतो, कसले विचार करतो ।
पडली आहे चिंता, येऊनी बैस आता ॥१॥

ज्ञान ध्यान सर्व गेले, तुज बघता नेत्र थकले ।
देह क्षीण झाला आता, येऊनी बैस आता ॥२॥

अती घोर काम क्रोध, दाविती अपुला जोर ।
वासना द्रम्बी भ्रमना, येऊनी बैस आता ॥३॥

मोह विकारे काया, जडली ही जाते वाया ।
कुठे ठेवू हारे माथा, येऊनी बैस आता ॥४॥

सुवर्ण हीच संधी, हातून जात आहे ।
उशीर का अनंता, येऊनी बैस आता ॥५॥

जैराम सांगे तुजसी, किती अंत रे बघशी ।
धीर नाही रे भगवंता, येऊनी बैस आता ॥ ६ ॥

भजन ३५ ( चाल : जडल्या गुरुच्या पदकाशी)

मन करी आत्म्याशी अर्पण ।
मग करी देवाचे स्मरण ॥ धृ० ॥
दुर्गुणाचे करी त्यागन ।
खऱ्याशी ठेवी जपून ॥ १ ॥
ठेवी मनी दया शांती ।
गुरुवरी ठेवी दृढ भक्ति ॥ २ ॥
बुद्धी, चित्त, स्थिर करी ।
विवेकाला नित्य धरी ॥ ३ ॥
कर्माचे ओळखावे वर्म ।
तेव्हा संग देईल धर्म ॥ ४ ॥
सांगा जीवाशी स्वधर्म ।
तुटण्या जीवाचे बंधन ॥ ५ ॥
हीच वाट दिसे सोपी ।
जैराम म्हणे घ्या परखून ॥ ६ ॥

भजन ३६ (चाल : मनाचा विसावा दुःखी जीवनात)

जीवाचा विसावा एक सत संग ।
नित्यनेम जावे भेटण्या पांडुरंग ॥ धृ० ॥ एक पांडुरंग
त्यजुनि आशा तृष्णा देह अभीमान ।
नामाचिया नादी, व्हावे तुम्ही दंग ॥ १ ॥ एक पांडुरंग
इंद्रियाशी लावावे सत्य वळण ।
तेव्हा भक्तिची, ऊठे ती उमग ॥ २ ॥ एक पांडुरंग

चित्त शुद्ध करोनि, ऐका संतवाणी ।
आणावे ते ध्यानी, भुलूनी बहीरंग ।। ३।। एक पांडुरंग
मनाचे ते भाव, बळकट करावे ।
तल्लीन व्हावे ते ब्रह्म तरंग ।। ४ ।। एक पांडुरंग
जैरामदास म्हणे एकचित्त भाव ।
सत्याचा तुम्ही करूं नका भंग ।।५।। एक पांडुरंग

भजन ३७ (चाल : घटा घन घोर . . .)

कंठ भरूनिया येतो गरीबांचो पाहुन गती,मन हे आवरेना।
भेट तूं कधी देशी मनमोहना ।।ध्रु०।।
दु:खी जीवाना पाहुनिया, नयनी येते पाणी ।
किती लोक उपवासी मरती, मिळेना मुठभर दाणी ।
धीर कुणी देईना, कोणीना रक्षण्या, तुजविन घनश्यामा ।।१।।
रात्रंदिवस कष्ट करुनी, मिळे न अन्न वस्त्र ।
पैसा नाही शिक्षण देण्या कैसी होई साक्षर ।
ही दैना पाहून, मन कळवळून, करतो देवा प्रार्थना ।।२।।
लोफरांना या काळी म्हणती सर्वच हुशार ।
धर्म नितीच्या व्यक्तिस म्हणती आहे भोंदु चोर ।
आली ऐसी वेळ, चालती लोक, काही भज सुचेना ।।३।।
जगात गांजा, मांस, मदीरा व्यापार वाढला ।
दही दूध अन ताक लोणी, कितीकांनी सोडला ।
वाहवा रे कैसी रीत, दुर्व्यसनाशी प्रीत, बदलला जमाना ।।४।।
ज्याची कमाई तोच आज, बनला आहे चोर ।
लपझप खोटें सांगणारा, बनती आज सावकार ।
दुष्ट नाश करावया, भक्त उद्धरावया,येई बा राधारमणा ।।५।।

मेंदासुर साऱ्या जगात येऊनिया ठेपला ।
म्हणोनिया रोगराई यांचा वाढ झाला ।
वाढली बिमारी,चळवळ झाली भारी,धाव म्हणती कृष्णा ॥६॥

भजन ३८ ( चाल : रमला कुठे ग कान्हा)

आनंद मनाला झाला, तुझ पाहुन रे विठ्ठला ॥धृ०॥

आत्म्याला पाझर फुटला, नेत्रातुनि धारा गळाल्या ।
कंप भरूनी आला, तुज पाहून रे विठ्ठला ॥ १ ॥

देहाची हरली सुद, भक्तिचा लागला नाद ।
तू सूर्या ठायी दिसला, तुज पाहुन रे विठ्ठला ॥२॥

बुद्धि ही स्थिरावली, आशा ही ठायीच मुरली ।
पाहुनी तुझ्या चरणाला, तूज पाहून से विठ्ठला ॥३॥

लहराची बरखा होई, तेव्हा नाम तुझें मी घेई ।
नाचे मी होऊनी मतवाला, तुज पाहून रे विठ्ठला ॥४॥

तुझ्या रंगात मी दंग, जिथे जाई तिथे तू संग ।
भुलू नको जैरामाला, तुज पाहून रे विठ्ठला ॥५॥

भजन ३९ (चाल : आला हरी हो आला हरी आल्या मझ्या . . . )

धरा हरी हो धरा हरी, धरा अपुल्या हृदयांतरी ॥धृ०॥

भाव धरोनी भक्ति करी, धाऊनी येईल श्रीहरी ।
कामात, संकटात, अहर्निशी त्याच्या संगात ॥१॥

उणे नाही मग कुठे तरी, देव त्याचे कामे करी ।
सोडोनी पंढरी, देव त्याचे घरी पाणी भरी ॥२॥

जनाबाईचे दळण, दळले त्याने येऊन ।
रानात, वनात शेणी वेची तो रंगात ॥३॥

मातीत ते तुडविले, गोरोबाचे पोर उठविले ।
मेलेले जीवंत केले, असा तो कृपावंत ॥४॥

भावाविण भक्ति नाही, भक्तिवीण मुक्ति नाही ।
मनाला साधून, करा तुम्ही हे साधन ॥५॥

ध्यास धरा हा शिवाचा, त्याग करा षड्‌विकारांचा ।
जैराम तुम्हा सांगे, गोष्ट ठेवा ध्यानात ॥६॥

भजन ४० (चाल : मुझे प्यारा भारत मेरा)

मज भेट सख्या गोविंदा, तोड जन्म मृत्युचा फंदा ॥धृ०॥

कितीतरी जनम मरण झाले दुःखाचे किती डोंगर फिरलो ।
झाला जीवनाचा चेंदा ॥१॥

भेटीविन हुरहुर वाटे मनाला ।
तुजविन दुःख सांगू कुणाला ।
दावी मार्ग सोपा सादा रे ॥२॥

अपराधाच्या कोटी राशी ।
म्हणूनीं पामरा, पदरी घेशी ।
कशी न ये तुज चिन्ता रे ॥३॥

तू आई बाप असोनी ।
भेद का ठेवी माझे विषयी ।
ठेवू नको ही शंका रे ॥४॥

जैरामदास म्हणे हो जीवलगा ।
तुजविण कोणी ना उद्धारला ।
तारी तू ह्या मति मंदा रे ॥५॥

भजन ४१ (चाल : तुळशी पत्र वाहते मी . . . )

कष्टवूनी शरीर झीजवी, त्याने सुख पाहावे ।
त्याने सुख पाहावे, हरी नामे लागावे ॥धृ०॥
त्रास सहन करूनी घेई, सत्याचे नवल पाही ।
देव त्याचा सखा होई, पाहुनिया धाव घेई ॥१॥
रात्रंदिवस गुंतूनिया, त्याच्यासवे रमला ।
पूर्ण करी कामना, पंढरीचा तो राणा ॥२॥
अर्पूनीया भेदभाव, त्यानी मग शरणी जावे ।
निजस्वरूप ते बघावे, देहभाव ते नसावे ॥३॥
जैराम म्हणे ह्या संग, करा मी तू पण भंग ।
चढे भक्तिचा हा रंग, अवघा झाला पांडुरंग ॥४॥

भजन ४२ (चाल : मधुवंतीच्या सुरा सुरातुनी . . .)

सुपंथाने मी आठवितो, तुला रे भगवान ।
एक तू विनवणी घनश्याम ॥धृ०॥
नाही जवळी भक्ति सेवा ।
नाही बुद्धी शक्ति देवा ।
मंद मती मी शरणी आलो ।
पाहण्या सुखाचे धाम ॥१॥
धन द्रव्य नाही मजपाशी ।
कोटी अपराधाच्या ह्या राशी ।
कसे आठवू तुज जगजेठी ।
बुद्धी करी ना काम ॥२॥

मन हे माझे फिरे चौदीशा ।
जीवनी पडली सर्व निराशा ।
गोंधळलेले मन हे माझे ।
कसे मिळे विश्राम ।।३।।

कुठे तुला मी चन्दन लावू ।
बेल पुष्प कुठे तुला वाहू ।
सांग कसे मी तुला वंदू ।
सुचेना काही काम ।।४।।

जैराम म्हणे सर्वठायी भरला ।
दशांगुली भरूनी उरला ।
कोण वर्णी तुझ्या लीलेला ।
सर्व घटी मुक्काम ।।५।।

भजन ४३ (चाल : देव माझा विठु सावळा)

भाव ज्याचा असे हा भोळा ।
देव झाला त्याचा सोयरा ।।धृ०।।
जिकडे जाईन तिकडे हरी ।
पाठी राहुनी रक्षा करी ।
भक्ताच्या सवे तो खेळे ।
घेऊनी कळवळा ।।१।।
भक्ताचे कष्ट तो झेले ।
पाहुनी भाव निर्मळ ।
गोरोबाचे वाचविले पोर ।
पाहुनी लळा ।।२।।

निष्काम कर्मयोगी जो दिसे ।
देव त्याचा सारथी असे ।
न कळे त्याची कळा ।
पुरवी सोहळा ॥३॥

जैराम म्हणे असा कनवाळु ।
धाऊनिया येई दयाळू ।
राखी तो आपुल्या ब्रिदा ।
बैसुनी मळा ॥४॥

भजन ४४ (चाल : म्हणे राधा गिरिधारी)

सोहम् मंत्र उच्चारिरे ।
जीव तरण्या भव सागरी ॥धृ०॥

माळ फिरतसे रात्रं दिवशी ।
एकवीस हजार सहाशे श्वासी ।
अजपा जप नित्य निहारी ॥१॥

'हं' अक्षर ने श्वास उचली ।
'सो' शब्दांनी नेऊनी वसवी ।
जीव पलट सोहम् योगी निर्धारी ॥२॥

झोपत जागत अष्टप्रहरी ।
जपे मनाने मिळे सुखभारी ।
निर्वान पद मिळे झडकरी ॥३॥

सोडूनि जगाचा व्यवहार ।
चिन्तन करावे निरंतर ।
जैराम म्हणे धन्य संसारी ॥४॥

**भजन ४५** (चाल : भोळया गिरीजा वराला ध्यारे शिव शंकराला

निर्गुण पद साधणारा, विरला-ही नर असे ।
गुरुज्ञानाचे अंजन घालूनी, अजपा जप करीतसे ।।धृ०।।
मलाद्वाराने खेची वायूला,उलटापंथ चालवीतसे ।
नाभी अष्टदल कमली, कुंडलीनी जगवीतसे ।
मेरु मंडळाची शीडी करूनी,शून्य शिखर चढीतसे ।।१।।
निर्गुण पद . . .
भ्रमरगुंफ्यात जाऊनी वीराजी, जगमग ज्योती तेवीतसे ।
सतरावीच्या झऱ्यातूनी, अमृत नित्य झरीतसे ।
पिऊनिया योगी त्याला, नित्य तृप्त होतसे ।।२।।
निर्गुण पद . . .
आकाश मंडळी, लक्ष अंथरुनी विरला नर झोपीतसे ।
सर्व काम जाळूनिया, अंगी भस्म लावीतसे ।
जैराम स्वरूपी मग्न होवूनी, आपला आपण बघीतसे ।।३।।
निर्गुण पद . . .

**भजन ४६** (चाल : विठ्ठल तू आला भेटण्याला . . .)

ज्याच्या मुखी राम आला ।
त्याचा संदेह फिटला ।।धृ०।।
(त्याचा जन्म सफल झाला)
वासना ही ठाईच मुरली ।
मनाची भ्रांती फिटली ।
(चाल) भक्तिचा छंद लागला ।
विषयाचा चेंदा झाला ।
त्याचे साठी काही न उरला ।
पांडुरंग नयनी भरला ।।१।।

कामामध्ये राम पाही ।
जागृत स्वप्नी त्याच ठायी ।
(चाल) सुक्ष्म देह त्याचा खेळ ।
तोच सदगुरुचा बाळ ।
चार अवस्था त्याच्या ।
नारी भोगी वेळोवेळी ॥२॥

उन्मनी ही सुन्दर नारी ।
नेई जीवा सेजेवरी ।
क्रिडा करी सच्चिदानंद
सहस्र दळवरी ।
विसरुनी देह भान ।
एक तो मुकुंद उरला ॥३॥

नाम ज्याचा सिद्ध झाला ।
जन्म मृत्यू फेटाळला ।
(चाल) ऐसा रंगी जो रंगला ।
काळ काय करे त्याला ।
जैराम म्हणे विश्वची घर ।
ऐसा पद ज्यासि मिळाला ॥४॥

भजन ४७ (चाल : सखे ग काय भूल पडली कसा हा वाजवे मुरली)

दुजाचे पाहुनी ऐश्वर्य, मन हे तुझे कां झुरे ।
कुणाचे झाले याने भले, कशी तुज बुद्धी न येरे ॥धृ०॥

(चाल) लागली कशी कुसंगत भुलूनी अपुले स्वहीत ।
सोडली धर्मनिती ही, जीवाची माती केली रे ॥१॥

(चाल) भटके मन हे तुझे, विषय सुखाचे मौजेत ।
क्षणोक्षणी पाहुनी माया, मन हे नेहमी अडे ॥२॥

(चाल) पाहीना आपुली चूक, दुजाला बोल ठेवशी ।
कशी ही तुझी वागणूक, खोट्याला करीशी खरे ॥३॥

(चाल) आला तू कोणत्या कामा, जातोशी वाईट धामा ।
केलाशी जिवन मातेरा, सोडले स्वहीत सारे ॥४॥

(चाल)कुणाशी द्वेष तू ठेवी, कुणाशी हसुनी तू राही ।
म्हणे जैराम सोड हे चाळे, सतसंग सदा धरीरे ॥५॥

भजन ४८ (चाल-सोडा आता काळजीला विहीणी तुम्ही)

विश्वास केला ज्याचेवर, केला ज्याचेवर ।
मिळाले आम्हा त्याचे हे फळ ॥धृ॥

काही सुचेना माझ्या मनाला, रात्रदिवस वाहे अश्रूधारा ।
क्षीण झाले माझे शरीर, हे झाले शरीर ॥१॥ मिळाले

कोणा सांगावे बा हे गाऱ्हाणे ।
कुणी माझ्या बोलाचा विश्वास न माने ।
वाटे मनी हूर हूर, मनी हूर हूर ॥२॥ मिळाले

लबाडू लोक खोटे बोलती ।
पाप पूण्याची नसे मुळी खंती ।
पाहून त्यांचे हे जाळ, येई कळवळ ॥३॥ मिळाले

ज्याचे वरी मी, दया ती केली ।
त्यांनीच जिवनाची, हानी माझ्या केली ।
जैराम म्हणे ना सत्य विचार जीव झाला कासाकुळ॥४॥ मिळाले

भजन ४९ (चाल-सोडा आता काळजीला विठ्ठोणी...)

सोड बा या भ्रांतीला, तू भ्रांतीला,
ऐक बारे गुरु वचनाला ॥ धृ० ॥

भाव तू बळकट धर गुरुचरणी, देव पाही मग अपुले ठिकाणी ।
उघड तू ज्ञान दृष्टीला, ज्ञान दृष्टीला,
ऐक बारे गुरु वचनाला ॥ १ ॥

तल्लीन व्हावे संतचरणी, जाण्या अहर्निशी पाळी त्यांचा बोला ।
उद्धरण्या जिवाला, उद्धरण्या जिवाला,
ऐक बारे गुरु वचनाला ॥ २ ॥

काम क्रोधाला आधी मारावे, मद मोह,लोभाला ठायीच जाळावे ।
सोडी ओढाळ वासनेला, या वासनेला
ऐक बारे गुरु वचनाला ॥ ३ ॥

संताच्या ज्ञानाचा करू नको तर्क, नाहीतर तुला पुढे मिळे नर्क ।
सोडी तू खोटया भावनेला, मिळण्या देवाला,
ऐक बारे गुरु वचनाला ॥ ४ ॥

सर्वाभूती दया प्रेम धरी, जळी स्थळी पाही तेव्हा तू हरी ।
असे धडे दे तू मनाला, शिकवी मनाला,
ऐक बारे गुरु वचनाला ॥ ५ ॥

दया, क्षमा, शांती ज्याचे पाशी राही,
जैराम म्हणे, देव असे त्याचे ठायी ।
विश्वास ठेवी माझ्या बोला, जरी प्राण गेला,
ऐक बारे गुरु वचनाला ॥ ६ ॥

भजन ५० (चाल–भोळया गिरीजा वराला...)

जन म्हणती वेडा पीसा, नाही जानत त्यांची कळा ॥धृ०॥
मुर्ख म्हणती देव येतो, तेव्हा सर्वांशी सांगतो।
असे दावी चमत्काराला ॥ १ ॥
कोणी म्हणती सिद्धी साधले, जन लोकाला याने भुलविले।
समजे भूत भविष्य याला ॥ २ ॥
कोणी म्हणती जोतिष्यवाला, आहे हा रे ढोंगी बगळा।
झाला द्रव्य लुटण्याला ॥ ३ ॥
संत म्हणती आत्मज्ञानी, आत्मखुण दावी तत्क्षणी।
उद्धारण्या जगा अवतरला ॥ ४ ॥
कोणी म्हणती योगी होय, लावी आत्मसुखाची सोय।
रमतो विदेही अवस्थेला ॥ ५ ॥
जैराम म्हणे जैसे जन, तैसे दावी त्याला खुन।
जेव्हा जाईल त्याच्या वंशा, तेव्हा कळेल सर्व त्याला ॥ ६ ॥

भजन ५१ (चाल–तेरे सामने वाली खिडकी में...)

वाईट संगती तुझे मन, घडे मिळती तयापासून।
असे अंगी तुझ्या दुर्गुण फार, तशी संगती आवडे निरंतर ॥धृ०॥
खोटे नाटे आहे तुझे भाव, त्या रुपी मिळती तुला देव।
तिथेच तुला सुख शांती मिळे,जसे तुझ्या मनात असे चाळे।
जसी तुझी इच्छा असे, तैसे तुज एक मिळणार ॥ १ ॥
जैसे आवडे तुला कर्म, तैसेच तुला मिळे वर्म।
तेच असे तुझे धर्म, क्षणोक्षणी तू विचार करी।
ज्या पासुन सुख होई जीवा, तेचि मार्ग तु रे धर ॥ २ ॥

जीवन सुखी कुणाचें असेल, नित्य सतसंगत तू करीत जा ।
खोटे नाटे कर्म सोडुनी तू, नेहमी हरी भजनी रंगीत जा ।
तेच मार्ग सोपे तुला, संत वचन हृदयांत धर ॥३॥
जरी तुला डुबने आहे तर, पाप कर्म नेहमी करीत जा ।
जरी जीवन उद्धार करण्याचे आहे नित्य नाम हरीचे स्मरित जा ।
जैराम म्हणे ध्यान दे बोला, तेव्हा होईल तुझा-उद्धार ॥४॥

भजन ५२ (चाल-उठ पंढरीचा राजा...)

लुट भक्तिची महिंमा, धरुन संत संगा ।
अशी संधी पुढे तुम्हां कधी ना मिळेगा ॥टेक॥
आला तु ज्या कामासाठी, लाग तु रे त्याचे पाठी ।
भुलू नको कर्तव्याला, येऊनीया जगा ॥१॥
अेक अेक श्वास तुझा, अमोल किंमतीचा ।
खोऊं नको व्यर्थ याला, जिवनी पडे दगा ॥२॥
बैसुनिया पद्मासनी, सोहंम मंत्र घे पटऊनी ।
जाऊनिया गुरुच्याचरणी, पाहा पांडुरंगा ॥३॥
नांद बिंदु साधुनिया, ठेवी ध्वनी अन्तरी या ।
ध्यानी ध्याता साक्षी होसी, अमृत पिऊनी दंगा ॥४॥
जैराम सांगे तुम्हा, जीवनी ही गोष्ट आना ।
एकभाव दृढ करुनी, हरीननमी तुम्ही रंगा ॥५॥

भजन ५३ (चाल-ऊठ पंढरीचा राजा...)

उभा पंढरीचा राणा, वाळवंटी माझा ।
कटेवरी ठेवूनी हात, भक्ताचीया काजा ॥धृ०॥

पुंडलीक भक्त याने, केला वीटेवरी उभा ।
युगे अठ्ठावीस शोभा, आई बाप माझा ॥ १ ॥

दृढ भाव धरूनीया, शरण जो घेई ।
त्याचे तो नित्य वाही, शीरावरी ओझा ॥ २ ॥

गोऱ्या कुंभाराच्यासाठी, तुडवीली त्याने माती ।
द्रौपदीला वस्त्र पुरवूनी, ठेवी तिची लाज ॥ ३ ॥

दिन दुबळयाचा दाता, ऐके सर्वांची वार्ता ।
जैसा भाव धरूनी जाई, तैसा त्याचा काजा ॥ ४ ॥

विश्वदेव पाहिला ज्याने, अपुल्या अंतरी ।
जैराम म्हणे सखा झाला, नित्य देव ज्याचा ॥ ५ ॥

भजन ५४ (चाल—मंगलमय नाम तुझे सतत गाऊ दे )

प्रभु तुझे स्वरूप सदा ध्यानी येऊ दे ॥ध्रु ॥
काम क्रोध, लोभ, मोह पडो नेहमीचा विसर ।
सतत तुझ्या नामी मनी, वाचा रंगु दे ॥ १ ॥

मन हे जाई ज्या ठीकानी, तूच दिसे चक्रपाणी ।
अशी माझी बुद्धी नेहमी, सतत वाहूं दे ॥ २ ॥

प्रिती जडो सख्य जीवा, द्वेष कुनाचा न यावा ।
असे माझ्या हृदयी, नित्य भाव राहूं दे ॥ ३ ॥

मातृ भक्ति जन सेवा, घडो या करी देवा ।
शरीर माझे याच कामी, नित्य झिजू दे ॥ ४ ॥

प्राण जाई देहातुनी, परी राहो सत्य वाणी ।
दास जैरामाला नित्य कर्म घडू दे ॥ ५ ॥

भजन ५५ (चाल–मंगल नाम तुझे, सतत गाऊ दे...)

दिन दुबळ्याची सेवा नित्य घडू दे ॥धृ०॥
दृढ राहो मन माझे, संकट येवो कितीही।
सत्यकामी माझ्या मना, नेहमी रमु दे ॥ १ ॥
पर दुःख ते माझे दुःख असे, राहो हृदयी नित्य।
अशी मला त्याचे प्रती, दया येऊ दे ॥ २ ॥
तन मन धन अर्पण, लाभो माझे जिवनी।
हिच माझी रे विनवनी, सतत असु दे ॥ ३ ॥
नको मज धन मान, नको मज ते ज्ञान।
जैरामाशी नित्य तुझे, चरण पाहू दे ॥ ४ ॥

भजन ५६ (चाल–माझीया हृदयाच्या मंदिरी...)

आऊट या हाताच्या पंढरी।
जावे तुम्ही पाहण्या त्या श्रीहरी ॥धृ०॥
युगे अठ्ठाविस वीटे वरती।
ठेउनी हात कटे वरती।
केला उभा तो पुंडलिकाने,
भाव धरूनी अंतरी ॥ १ ॥
वामांगी शोभे रुखमाबाई।
भक्तांची ती करुणा घेई।
वाट बघीतसे दिन दुबळ्यांची,
कळवळा ये अंतरी ॥२ ॥
अनुभवाने पंढरी जावे।
निजस्वरुप नयनी बघावे।
आदि शून्यावरी बसुनी ध्यानी,
जैराम पाही ब्रह्मगीरी ॥ ३ ॥

भजन ५७ ( चाल–मंगलमय नाम तुझे... )

प्रभु तुझा माझा संग, नित्य घडू दे ॥धृ०॥
विसर ना पडो तुझा, हृदयी दे मज जागा ।
मनी यांचा भाव माझ्या, सर्व त्यजुनी तुझे,
नाम मुखी येऊ दे ॥ १ ॥
मी पाहीन जिकडे तुला, तिकडे दावी स्वरुप मला ।
हीच माझी आस, तुझ्या ध्यानी येऊ दे ॥ २ ॥
चंद्राविन जणु चकोर, जणु जलविण मिनाक्षी ।
तशी तुझी प्रिती, अखंड राहू दे ॥ ३ ॥
देह जावो अथवा राहो, तुझ्या चरणी दृढभाव ।
जीव गेला माझा तरी वचन निभु दे ॥ ४ ॥
जैराम म्हणे जन्मोजन्मी, देह लागो तुझे कामी ।
हीच विणवनी कानी, तुझ्या येऊ दे ॥ ५ ॥

भजन ५८ (चाल–प्राण्या क्षणभर तरी श्रीराम भज रे...)

साधका मनाला तू, आवरून धरी रे ॥धृ०॥
तेव्हा तू निजपदी, सावरून बैस रे ।
पद्मासन योग लावून, मन कल्पना सोड रे ॥ १ ॥
अनहद धुनी लावूनी, चित्त चैतन्यात मिळवि रे ।
द्वेषभाव अल्प बुद्धी, याला तू जाळी रे ॥ २ ॥
सत्यभाव युक्ति करुनी, भक्तित लक्ष देई रे ।
प्रगट होई शक्ति तेव्हा, जीव मुक्त होई रे ॥ ३ ॥
निजस्वरूपी प्रेम ठेऊनी, जन्म मृत्यू चुकवी रे ।
गगन मंडळी लक्ष लावूनी, स्वर्ग सुख पाही रे ॥ ४ ॥

ज्ञान दृष्टिचे अंजन घालुनी, ब्रह्मरस पीई रे ।
जैराम म्हणे बाबा तू, गुरुचरण धरी रे ॥५॥

भजन ५९ (चाल--अगर है ज्ञान को पाना...)

नको तो भार भूवरती, दुसऱ्याचे खून पीणारा ।
पाहिजे स्वहीत साधुनी, जनाचे हीत करणारा ॥ ध्रु० ॥
देश धर्माला रक्षण्या, तनमनधन वाही आपुला ।
झिजवुनी आपुली काया, जनाला प्राण देणारा ॥ १ ॥
त्यजी मानापमानाला, कुणी निंदो किंवा वंदो ।
दृढभाव धरुनी हृदयी, जनसेवेस झटनारा ॥ २ ॥
सोडूनी संकल्प विकल्प, ठेवी समदृष्टी धनी-गरीबा ।
भेद ना मुळी असे त्याला, सर्वांवरी प्रेम करणारा ॥३॥
म्हणे जैराम कीर्ति राही, कर्म योगी मनुजाची ।
ठेऊनी जाई अमर नांव परोपकार करणारा ॥४॥

भजन ६० (चाल-असा धरी छंद जाई तुटुनिया भगवंत)

ज्याचे विचार असे ऊंच, त्याला जन म्हणती भगवंत ॥ध्रु॥
नाही द्वैत ज्यांचे मनांत, समदृष्टी ठेवी सदोदित ।
चित्त ठेवी हरी भजनांत, नित्यरमत ॥१॥
सोडुनी मोहमायेची आशा, पाही सर्वठाई जगदिशा ।
रमतसे विदेही दशा, राही डौलात ॥२॥
सत्नाविचे पिई अमृत, राही सदा त्या नशेत ।
जीवंत असूनी असे मुक्त, असा भाग्यवंत ॥३॥
जैराम म्हणे जगा दिसे पिसा, कुणा नकळे त्याची दशा ।
विश्वची पाही आपुले आंत, त्याला जन म्हणती भगवंत ॥४॥

भजन ६१ (चाल–कुणी तरी काढा चाप)

देवा तुझ्यावाचून, जीवाला कुठे मिळेना थार ॥ध्रु.॥
करमत नाही कोण्या ठिकाणी, फसवी मायाजाल ॥१॥
पदोपदी हा दिसे मज धोका, उभा आहे तो काळ ॥२॥
धैर्य मनी थोडे न उरले, चिंता येई वारंवार ॥३॥
जे जे मिळती स्वार्थ हिताचे, अंती करती बेजार ॥४॥
तुजवीन सुना मनमंदीर हा, येऊनी करी उद्धार ॥५॥
जैराम म्हणे तुजविण कोण, करील मज भवपार ॥६॥

भजन ६२ ( चाल–कुणी तरी काढा चाप)

धरी तु मनाचा तोल, प्राण्या गोविंद गोविंद बोल ॥ध्रु.॥
त्याविन तुजला सुख ना मिळे, खोऊ नको समय अनमोल ॥१॥
किती तरी दुःख तू सोशीले, हरीशी नाते जोड ॥२॥
इथे मायेचे सर्व संगाती, अंगी होती खोड ॥३॥
जसे करशील तसे मिळेल, मानू नको तू फोल ॥४॥
खऱ्या खोटयाचा विचार करुनी, जीवन करी उज्वल ॥५॥
ज्या कामाला इथे आलाशी, आयुष्य केले गोल ॥६॥
जैराम म्हणे संतसंग धरुनी, भवबंधन तु सोड ॥७॥

भजन ६३ (चाल– गुण दोष हमारे ना देखो. . .)

इथे तुजला सर्व मिळती रे, ठग तुझा खून पिणारे ।
कोणी न तारक मजशी दिसे, सोडून तुज अंती जाती रे ॥ध्रु.॥
वेळप्रसंगी कामी न पडती, स्वार्थापुरती लावतीप्रिती ।
ऐसी जगाची आहे रीती, हे पाहूनी चाल गड्या तुरे ॥१॥

छल कपटी दुराचारी, मिळतील बहु या संसारी ।
यांचे पासून सुख न मिळे, जीवनाची माती करती रे ॥२॥
लई जन्माने समय मिळाला, खोऊ नको या घटकेला ।
मुखी राम नाम घेवूनी तूं, जीवनाचे सार्थक साधी रे ॥३॥
जैराम म्हणे पाहूनी चाल, नाहीं तर तुझे होतील हाल ।
मायेच्या फंदी जे सापडले, ते सर्वंची नाडल्या गले रे ॥४॥

भजन ६४ (चाल—आई म्हणोनी कोणी आईस हाक मारी)

संतासी संत, अग्नि-दुःखीतास दुःखी जाणे ।
कैसे कळेल इतरा, त्यांचे नसे गऱ्हाणे ॥धृ.॥
बाळास अंगी घेई, स्तनपानी आई लावी ।
वात्सल्य कोण जाणे, दुःखितास० ॥१॥
शांति समुद्र शोभे-धारिष्टय मेरु शोभे ।
वज्रासमान असणे, दुःखितास० ॥२॥
निजधर्म संत पाळी, निष्कर्मता संभाळी ।
निजभक्ति अंगी बाणे, दुःखितास० ॥३॥
उपकार सर्व ठावा-अपकार घेऊनिया ।
दुबळयास सबळ करणे, दुःखितास० ॥४॥
वंधाप्रती त्या जाता-तुला कळे व्यथा त्या ।
घाण्यास घाव जाणे, दुःखितास० ॥५॥
संतास देव जाणे, देवास संत जाणे ।
हे अधिकार प्राप्त करणे, दुःखितास० ॥६॥
हे बोल स्वानुभावे-जैराम सांगे सर्वा ।
अपुल्या वरोनी पाहाणे, दुःखितास० ॥७॥

भजन ६५ (चाल–मैं तो गिरिधर के आऊँ)

माझा, प्रेमळ पंढरीराजा ।।ध्रु०।।
पतीत पावन परम पवित्रा, वाहे चंद्रभागा ।
चरण कमल द्वय ठेवूनी राही, विटेवर तो भाऊ ।। १ ।।

मकरकुंडले कर्णी शोभती, कंठी तुलसीमाळा ।
सुवर्णमणीमय किरीट शोभे, केशरी बुक्का माथा ।। २ ।।

शंखचक्रगदापद्म विभूषित, कासे पितांबर बांका ।
जैराम म्हणे पर ब्रह्मा, राख राख मम लाजा ।। ३ ।।

भजन ६६ ( चाल–आरती करूं हरिहर की )

सर्वदा सत्य बोलावे, सत्य ऐकावे, सत्य चालावे ।
ते धडे जना शिकवावे ।।ध्रु०।।

हरिश्चंद्र नृप स्वप्नि विचित्रा, वचन दिधले विश्वामित्रा ।
आणि गमावि भार्यापुत्रा, वचन कधि न सोडावे ।। १ ।।

दशरथ वचना पाळायाशी, राज्यपदाला त्यजी रघुवंशी ।
प्राण जाई पण वचन न जाई, सत्य अंगी बाणावे ।। २ ।।

हुकुमचि करीता श्री शिवराणा, लग्न मोडुनि जाई ताना ।
सिंह गडास्तव लावी प्राणा, देशकारणी धावे ।। ३ ।।

निर्मल, सत्य, अहिंसावादी, असहकारिता लढवी गांधी ।
घरोघरी अन् चरखा खादी, व्रिदास न सोडावे ।। ४ ।।

जैरामदास म्हणे बापा, बोला सत्यचि तुम्ही चाला ।
सत्यवृत्ति ह्यो अंगी बाणा, प्रभूला हे मागावे ।। ५ ।।

भजन ६७ (चाल-बालम आये बसो मेरे मन मे)

निशीदिनी प्रभुचे नाम स्मरावे,
मनु देहाला सार्थ करावे ॥ध्रु०॥
यज्ञयाग जपतप आसने, कर्मज्ञान योगादि साधने ।
नको जावया गिरी कानने, प्रभुपदी रंगुनि जावे ॥ १ ॥
चित्तपापमल नाशन कारण, विषय वासनेन्द्रिय उच्चाटण ।
आत्मज्ञान होईल संपादन, पळीपळी प्रभूशी भजावे ॥ २ ॥
पूर्व कर्मसंचित फळाले, रत्न अमोलीक शरीर मिळाले ।
व्यर्थचि समय का घालविले, बंध्र विमोचित व्हावे ॥ ३ ॥
कितीक जण नामाने तरले, मोक्षपदाला मिळूनि गेले ।
तुकाराम वैकुंठा गेले, नामचि श्रेष्ठ म्हणावे ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे रे प्राणी, भजभज प्रभूला अशनिशयनी ।
नेम न जाईल घडी निर्वाणी, संतपदा ओढावे ॥ ५ ॥

भजन ६८ (चाल-चांदी की दीवार ना तोडी )

हरी भजनाला लागरे प्राण्या, सफल करी या जिवनाला ।
का धन द्रव्यात बुडाला, वेश्या संग कुणाचा तो गेला ॥ध्रु०॥
किती झाले राजे महाराजे, योद्धे या भूमि वरती ।
सोडुनी गेले महाल माडी, कफनी नेली कां अंगावरती ?
गेला कोठे थोरपणा, अंती कुणी कामी न आला ॥ १ ॥
जगी येउनी जीव विसरला, नाते जोडले मायेशी ।
मी तू पण हे अंगी भरले, लागे उपाधी पाठीशी ॥
जनम मरण चक्रांत ग्रासला, विसरून गेला देवाला ॥२॥

सत्संगाने पापी तरतो, नामाची ऐसी ख्याति।
जैरामदास म्हण रे बाबा, सत् कर्माने तू तरशी ।।
सोडूनी दे ढोंग पणाला, जिव लावी सत्कार्याला ।। ३ ।।

भजन ६९ (चाल--मैं देखूं जिस ओर सखीरी)

ज्याचे हृदयी, नीती धर्म ।
तोच जगी विजयी म्हणवी ।।धृ०।।
आल्या संकटी धैर्य न सोडी, वचन कधि ना मोडी ।
प्राण हरो त्याचे कुणीही, भीती त्याची मुळीच नसे ।। १ ।।
हार कधि तो शिकला नाही, खोटयाशी सामना करी ।
असले गुण ते विरत्वाचे, प्रण पाळण्या प्रण लावी ।। २ ।।
सर्व जिवावरी करुणा प्रेम, ठरवून घेती जीवन नेम ।
सत्य, अहिंसा, मंत्र तयाचे, हेच वसे त्यांच्या ध्यानी ।। ३ ।।
विश्वची केले त्यांनी घर, सर्व झाले कुटुंब परिवार ।
जैराम म्हणे ज्या अंगी गुण, किर्ती तयाची राही जगी ।।४।।

भजन ७० (चाल-बाबा सबसे मीठा बोल)

बाबा खरा खोटा पाहे । बाबा खरा खोटा पाहे ।। धृ० ।।
आपुल्या आहम्याला साक्ष ठेऊनी, पाही अवगुण आपुल्या मनी ।
क्षणीक्षणी रे विचार कर तू, वाईट कोण आहे ।। १ ।।
जोवरी असे दुर्गुण अंगी, सर्व दिसती तुला कुढंगी ।
थोडी न शांति जीवनी मिळाली, मन भटकत राहे ।। २ ।।
फिरसी नेहमी लबाड संगती, बुद्धी जाई वाईट कामी ।
काम क्रोधाच्या वशी तू झाला, द्वेष मनी राहे ।।३।।
जैरामदास म्हणे रे बाबा, कर्म करतो तू राक्षसाचे ।
नाव घेतो तू नेहमी देवाचे, खोटे खरे तू पाहे ।। ४ ।।

भजन ७१ ( चाल–बाबा मन की आँखें खोल )

भक्तांचे करी मोल देव, भक्तांचे करी मोल ॥धृ०॥
सोडून सारे थोरपणाला, भक्ताचा तो अंकित झाला ।
भक्त जेव्हा भजनी रंगला, येऊनी सांभाळी तोल ॥ १ ॥
जिथे चाले संतवाणी, प्रेरणा देई चक्रपाणी ।
सर्व जिवाला शांती मिळतसे, ऐकूनी त्याचे बोल ॥ २ ॥
संकल्प करी ज्या कामाचा, पूर्ण करी देव त्यांची इच्छा ।
ठेऊनी हृदयी दृढभाव, शब्दाचे न करी फोल ॥ ३ ॥
दामाजीवर वेळ पडली, धाऊनी त्याची हुंडी चुकविली ।
देव झाला विठू महार, हिशोब केला गोळ ॥ ४ ॥
तन, मन, धन,जो अर्पण करी,देव त्याचा होतो कैवारी ।
जैरामदास म्हणे रे ऐका, बोलाचे हे अनमोल ॥ ५ ॥

भजन ७२ (चाल–बाबा मन की आँखें खोल)

झाले पोटाचे हे दास, सर्व पोटाचे हे दास ॥धृ०॥
नाही केली तुझी आशा, म्हणूनी झाली अशी दशा ।
फिरती वेडे होऊनी, सर्व जीवन केला नाश ॥ १ ॥
पोटासाठी धर्म विकीला, देव भक्तिला तो हा मुकला ।
दावी अपुल्या थोर पणाला,पडला जन्म मृत्युचा फास ॥ २ ॥
पाप पुण्याचा विचार न केला,मनात आले तसा चालिला ।
भुलला बाबा सत्कर्माला, लाऊनी खोटी आस ॥ ३ ॥
नाम विसरला,काम विसरला,आळसामध्ये दिवस खोविला ।
नरदेहाचे सार्थक न केले, कालोभाचा घास ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे रे बाबा, आला तैसा निघूनी गेला ।
ओळखले नाही सत्कर्माला, केला न जिवनी विकास ॥ ५ ॥

भजन ७३ ( चाल-झडकरी सुदीन दावा देवा)

ज्यानी मुखी राम घ्यावा, त्यांनी नियम पाळावा ।।ध्रु०।।
सोडुनि सर्व प्रपंच उपाधी, रहावे सदा देवानंदी ।
अहंकार तो मनी नसावा, निती त्यांनी नियम पाळावा ।। १ ।।
सर्व जिवाशी लाऊनि प्रिती, सुख दु:खात व्हावे साथी ।
खरा मार्ग धरावा, त्यांनी० ।। २ ।।
बहु लीन होऊनी जावे, जना करीता शरीर वहावे ।
निष्काम करावी सेवा, त्यांनी० ।। ३ ।।
अंतरी दया बहुत असावी, त्यापासुनी शांती मिळावी ।
असा मार्ग धरावा, त्यांनी० ।। ४ ।।
जैराम म्हणे मार्ग हा सोपा, चुकविण्या जन्म मृत्युच्या खेपा ।
ऐसा ध्यास घ्यावा, त्यांनी० ।। ५ ।।

भजन ७४ ( चाल—लाडक्या पुंडलिका भेटी )

कळेल का संताचा भेद, मनी असे विषयाचा छंद ।।ध्रु०।।
रात्रंदिवस खोट्या कामी, भटकत फिरतो त्या अभिमानी ।
भुलुनिया स्वहिताला, झाला असे मति-मंद ।
कळेल का संताचा भेद ।। १ ।।
मनी आहे काम क्रोध, नाही अंगी सद्गुण बोध ।
पाप पुण्याचा न लावी शोध, हरी नामी नसे मुळी गंध ।
कळेल का संताचा भेद ।। २ ।।
माझे माझे म्हणूनी भुलला, ओळखले नाही नरजन्माला ।
आयुष्याचा नाश केला, पडला काळाचा वेध ।
कळेल कां संताचा भेद ।। ३ ।।

जैराम म्हणे येऊन जन्मा, केला नाही सतसंगा ।
जन्मोजन्मी पडले दुःख, अंतरलो ते पांडुरंग ।
कळेल का संताचा भेद ॥४॥

भजन ७५ (चाल–तुमबिन मोरी कौन खबर ले)

भोग असे हा प्रारब्धाचा, चुकला नाही कुणा ।
गड्यारे चुकला नाही कुणा ॥ध्रु.॥

देव जरी हा झाला सखा, संचित लिहिले चुकेना ।
कोटी उपाय करे जरी कोणी, मिटल्याने न मिटेना ॥१॥

राजा हरिश्चंन्द्र तारामती, वाही डोमाघरी पाणी ।
किती वीर ते पांडव पाहा, भोगीले वन यातना ॥२॥

राजा असो वा असो रंक, संत असो वा ज्ञानी ।
कर्म फल ते असे ज्याचे, चुकले नाही कुणा ॥३॥

जैरामदास म्हणे सर्वांचे, संचित वेगळाले ।
संतचरण धरल्याने, तुटती भवबंधना ।
गड्यारे तुटती भवबंधना ॥४॥

भजन ७६ (चाल–ठुमकि चलत रामचंद्र)

माझा आवडता श्रीरंग, त्याविन कोणी नाही ॥ध्रु०॥

लागला तो त्याचा छंद, भरली नयनी असें धुंद ।
सुचेना मजशी काही, एक तो गोविंद, माझा आवडता श्रीरंग ॥१॥

देहभान हरपले, कामधंदा विसरले, लागली त्याची मोहनी ।
मावे ना आनंद ॥२॥

तो झाला असे माझा, मी झालो त्याचा, अहर्निशी त्याचा भास।
जुळला हा संबंध ॥ ३ ॥
जागृत आणि स्वप्नी, राहे माझे पाशी, जैरामदास म्हणे।
त्याचा माझा संग ॥ ४ ॥

भजन ७७ (चाल–माझ्या या नयनाच्या लोचनी)

माझा तो आवडता श्रीहरी, करमेना त्याविण क्षणभरी ॥ घृ०॥
रात्रंदिवस त्याची चिंता, सूचत नाही त्याविण आता।
जीवन झाला कासाविसा, तळमळ अंतरी ॥ १ ॥
सूचत नाही खाणे पिणे, आवडी नाही द्रव्य भूषणे।
लागली त्याची मला मोहनी, विटले मन संसारी ॥ २ ॥
जिकडे जाई तिकडे हरी, झोप ती नाही माझीया नयनी।
जसा गारुडी कठपुतली नाचवी, माही तैसा परी ॥ ३ ॥
विश्व झाले माझे घर, देव झाला परिवार।
जैराम म्हणे त्याविन दुजा, कोणी ना कैवारी ॥ ४ ॥

भजन ७८ (चाल– उद्धरी गुरुराया )

देवा यारे या झडकरी, या भेट पंढरीराया।
देवा यारे या ॥ घृ० ॥
लई जन्माचा भुकेला, दर्शन देई मजला, हा जीव उद्धरण्या।
कुणी त्राता दिसेना मज आता, देवा या रे या ॥ १ ॥
भटकत फिरता हे दिवस किती, पडली मजला भ्रांती।
मिळती ना मजला कुठे शांती झाली ही दुरगती ॥ २ ॥
देवा संसार–सागरी, येरझारी, पडलो गा मुरारी।
कोणी तुजविण ना मज तारी, दुःख हे मोठे भारी ॥३॥

देवा मागे लागले त्रिताप, मनी होतसे संताप।
कोण हरील माझे हे पाप, तुझ्या हाती हे माप, देवा ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे गाऱ्हाणे, तुजवाचून न जाणे।
काय कुणा सांगु प्रारब्ध, करता हरता तूच ॥ ५॥

भजन ७९ (चाल– उद्धरी गुरुराया)

देवा दुःख हे इथे मोठे, मनी मन वाईट वाटे ॥धृ०॥
माया बाजारी जिव हा, होत असे लाचारी।
सुचत मज नाही संसारी, धैर्य मना नच धरी ॥ १॥
अहर्निशी चिंता उभी राही, सत्य कर्म होत नाही।
मन हे विचलित होत असे, भ्रमणी पाडीत असे ॥ २ ॥
फिरतो चहुदिशा वेडापिसा, होऊनी खोटी आशा।
झालो बेजार, मिळेना इथे कुठे मज सार ॥ ३ ॥
चालतांना काटे, पदोपदी, रुतती मजला भारी।
जीवा चैन नसे, अंतरी, विसावा न क्षणभरी ॥ ४ ॥
जैरामदास म्हणे, इथे तरने, हे तू अंतरी जाणे।
येऊनी झडकरी मज तारी, सख्या तु रे मुरारी ॥ ५ ॥

भजन ८० (चाल– गडे हो कृष्ण गडी अपुला)

खरे सुख राम भजनी आहे, मना तू शोधुनि पाहे ॥धृ०॥
मिळाले धन द्रव्य किती, मिळे ना जीवाला शांती।
सर्व हे खोटे ठरत आहे, मना तू शोधूनी पाहे ॥ १ ॥
मिळे जणी कुणी महालमाडी, हत्ती-घोडे बसण्याला।
तरीपण दुर दुर राहे, मना तू० ॥ २ ॥

कुणाला मिळे संतान, कुणाला मिळे राज पाट ।
तरी ना चैन मनी राहे, मना तू० ॥ ३ ॥
हे सर्व मायेचे खेळ, भुलला जीव अज्ञानी ।
स्वहीत ना आपुले पाही, मना तू० ॥ ४ ॥
लाविला पाठीशी गोंधळ काम क्रोध दाविती जोर ।
जन्म मृत्यु फिरत आहे, मना तू० ॥ ५ ॥
जैराम म्हणे एक दिवस, तुजला था असा येई ।
काळोबा जीव तो नेई, मना तू० ॥ ६ ॥

भजन ८१ (चाल– देवा झडकरी सुदीन दावा)

जो घेणे शिकला जीवन भरी ।
तो का देईल, मग कुणातरी ॥धृ०॥
ज्याचे मनी असे अशांति ।
तो का काढील दुज्याची भ्रांति ।
तो कसे जीवन आपुले तारी ॥ १ ॥
मुर्खापरी फिरे जगात ।
घेऊन अंगी खोट वेश ।
नेहमी करी फसवेगिरी ॥ २ ॥
जना दावी थोरपण ।
अंगी नाही तैसे गुण ।
जाई मोह मायेच्या आहारी ॥ ३ ॥
जैराम म्हणे स्वतः करावे ।
मग दुसऱ्यासी ते शिकवावे ।
तोची दीनाचा कैवारी ॥ ४ ॥

भजन ८२ (चाल–कशाला काशी जातो रे बाबा)

कुठवरी त्रास द्याल रे बाबा, कुठवरी मौज भोगाल ।। ध्रु० ।।
पाप पुण्याचा विचार नाही, खोटे काम तू करतो ।
दीन दुबळ्यांना दुःख देवूनी, त्राही त्राही तू करतो ।
पुढे तुमचे होईल हाल, कुठवरी मौज भोगाल ।। १ ।।
काम क्रोधाच्या वशी होऊनी, दाविशी थोरपणा ।
दया धर्म मुळीच नाही, दावीशी शहाणपणा ।
पाखंडाची तुमची चाल, कुठवरी मौज भोगाल ।। २ ।।
शास्त्र पुराण पठण केले, दंभ तुझा न गेला ।
लोकासमोर माळा फिरविशी, देवाशी वैर केले ।
अंतरी तुझे ढोल पोल, कुठवरी मौज भोगाल ।। ३ ।।
जैरामदास म्हणे रे बाबा, करशील तसे भरशील ।
कर्म फल चुकणार नाही, खरे सांगतो तुजसी ।
ऐक माझे सत्य हे बोल, कुठवरी मौज भोगाल ।। ४ ।।

भजन ८३ (चाल–दत्त दिगंबर दैवत माझे)

भक्ति भावना वैराग्याची, सत्य अहिंसा शोभा जीवाची ।।ध्रु०।।
देह झीजविणे दिनापरी, निष्काम कर्म जो नर करी ।
सज्जना निववी अपुल्या अंतरी, गोडी पाहिजे सज्ञानाची ।।१।।
करुणा प्रेम आत्म चिंतन, परोपकारी राही ध्यान ।
द्वैत भाव तो सोडुनी, लीनवृती सदा त्यागाची ।।२।।
देव पुजावे मन मंदिरी, यात्रा करावी आपुले अंतरी ।
स्नान करावे सत्रावी झरी, एकी करावी जीव शिवाची ।।३।।
जैराम म्हणे अजपाजप, सोहंम मंत्र नित्य जप ।
जन्ममृत्यूची चुकवी खेप, वाट सरा ही साधकाची ।।४।।

भजन ८४ (चाल–राम राम राम नाम जपत जा सदा)

सत्य काम मध्ये राम, पाहत जा सदा ।। धृ० ।।
धरुनिया दृढभाव, भक्ती करी निर्मळ ।
मुखी राम नाम घ्यावा, विसर ना कदा ।। १ ।।
सोडुनिया अभिमान, पाही सर्वांशी समान ।
ठेवू नको मनि द्वैत भाव, लाग हरि नादा ।। २ ।।
लावी इंद्रीयाशी वलण, वशीभूत करी मन ।
सोहंम मंत्र उच्चारण, करित जा सदा ।। ३ ।।
जैराम म्हणे साधकाशी, सोपे मार्ग तरायाशी ।
विसरु नये कधी याशी, नेई मुक्ती पदा ।। ४ ।।

भजन ८५ (चाल–माझीया नयनाच्या कोंदणी)

भ्रांती मनाची मिटे दर्शनाने,
तुटती सारी जीवन पाळणे ।। धृ० ।।
जेव्हा मन स्थिर होई, हरि भजनी रंगून जाई ।
सोडून सारी दुष्ट कल्पना, राही आत्मचिंतनी ।। १ ।।
मी खेळीन बाळप्रमाणे, सुख दुःख सोसीन आनंदाने ।
नाही चिंता या देहाची, जाणे अथवा राहाणे ।। २ ।।
कृपा ज्यावर गुरुची असे, त्याला जगी उणे नसे ।
मी तू पण हे जीवाचे गेले, उरले न घेणे देणे ।। ३ ।।
पद वंदना व्यवहारी रीत, पूजा करणे असे प्रित ।
संत दर्शन अंधार, मिटवूनी प्रकाश पाहाणे ।। ४ ।।
रज धुळाचे नाव ज्ञान, अनुभवाने करी ओळखन ।
जैराम म्हणे जीव शिवाची, एकी करुनी घेणे ।। ५ ।।

भजन ८६ (चाल–दत्त दिगंबर दैवत माझे)

भेटीविन तुझ्या व्यर्थची जीणे ।
विनाकारण जन्म घेणे ॥ ध्रु० ॥
येऊनी जन्म भूभार झाला ।
पशुप्रमाणे व्यवहार केला ।
जरी न देवाचे दर्शन घडले ।
जीवन त्याचे मृत प्रमाणे ॥ १ ॥
कुटुम्ब परिवार मिळे सर्व योनी ।
खाणे पिणे सर्व ठिकाणी ।
संत चरण ते लाभण्याला ।
जन्मोजन्मीचे पुण्य असणे ॥ २ ॥
धन दौलत अन हत्ती घोडे ।
देवा वाचूनी खोटे ठरे ।
माया मोहनी संसार सागरी ।
जीवाला टाकी बंधने ॥ ३ ॥
सर्व रोगी तु ज वा चू नी ।
चैन नसे कुणाच्या मनी ।
जैराम म्हणे हुर हुर वाटे, येवूनी मजसी दर्शन देणे ॥ ४ ॥

भजन ८७ ( चाल–पाण्या निघाली राधा गौळणी )

कुणा रामाची गोडी, कुणा कामाची गोडी ।
कुणा रिकामे आवडी, तैसे घेऊनी सौंगडी ॥ ध्रु० ॥
खेळ निराळे सर्वांचे हे, आवडे ज्याला तसा तो चाले ।
त्या आनंदाने लहरी डोले, त्यापरी जमवितो जोडी ॥ १ ॥

जसा ज्याचा अंतरी भाव, तसा देई त्याला ठाव।
साह्य होई पंढरी राव, मुखी त्याची आवडी ॥ २॥
जसे ज्याचे असे संस्कार, तसे त्याला येती विचार।
कुणाचे कुणाला न मिळे सार, सर्वांचा एक वनमाळी ॥ ३ ॥
जैराम सांगे सर्व जनांना, सर्व सोडूनी सत्संग ध्याना।
आल्या जन्मा देव मिळवाना, हेच मजला आवडी ॥ ४ ॥

भजन ८८ (चाल-ये री मैं तो प्रेम दिवानी)

हारले मी कृष्ण कन्हैयाशी, प्रीत लाऊनिया।
उरला नाही त्याविण दूजा, प्राणाचा प्राणपिया ॥धृ०॥
कशी करावी पूजा अर्चा, कसे लावावे गंध।
कसे वाहावे पुष्प तुला रे, सुचत ना मनी या ॥ १ ॥
तुझा नाद लागला मजशी, चैन नसे जीवा।
वेडापिसा होऊनी फिरतो, ठाव दे मज सखया ॥ २ ॥
देवावीना देऊळ सूने, पतिवीण सती।
तुझ्यावीण तैसी स्थिती, झाली प्रभुराया ॥ ३ ॥
तन मन धन तुज अर्पण केले, स्वरुप तुझे पाहण्या।
जैराम म्हणे नको मज काही, तुज वाचूनिया ॥ ४ ॥

भजन ८९ ( चाल-देव माझा विठू सावळा )

गाऊ नामाची महिमा, जीवा लाऊ हरीच्या कामा ॥धृ०॥
जेणे जन्माचे पातक हरे, त्रितापा शांति मिळे।
हरिनामी जे रंगले, घेऊनी नामा ॥ १ ॥
त्याचे गुण असे आगळे, पतितांचा उद्धार करे।
जो कोणी काया, वाचा मनसा धरुनी, लागी जो कामा ॥ २ ॥

प्राण्या सावधान तू होई, जीवन सफल करुनी घेई।
आल्या कोण्या कामाशी, चाली तू नेमा ॥ ३ ॥
जैराम म्हणे विचार करी, क्षणोक्षणी नाम उच्चारी।
मिळे ना संधि पुन्हा, मिळवी तू रामा ॥ ४ ॥

भजन ९० (चाल–आज श्याम मोह लीनो बांसरी बजाय के)

लाज ठेवी देवा तू, दीन दुबळ्याची।
करुणा ऐकूनी ये तू, या पामराची ॥धृ०॥
उद्धारिले किति पतिता,ठेवीले ज्याने चरणी माथा।
तन–मन–धन अर्पियले, आशा धरुनी भेटीची ॥ १ ॥
ऐकूनी हाक द्रौपदीची, धावूनी आला संकटाशी।
येवूनी चीर पुरविले, रक्षिले ब्रिदाशी ॥ २ ॥
भरला तुचि सर्व ठाई, असे वेद देती ग्वाही।
तुझ्या सत्ते वाचुनिया, चाले ना कुणाची ॥ ३ ॥
अशी तुझी थोर लीला, काय कळे पामराला।
जैरामाशी पदरी घ्यावे, आस दर्शनाची ॥ ४ ॥

भजन ९१ (चाल–आज श्याम मोह लिनो बांसरी)

नाम तारी नाम मारी, नाम ही कैवारी।
त्याविणा जगामध्ये, कोणी ना उद्धारी ॥धृ०॥
विसावा तो जिवाचा, घेई नाम होई त्याचा।
त्यावाचुनी सुखी कोण, झाले जगांतरी ॥ १ ॥
वाटे सोपे पाहण्याशी, परी कठीन घेण्याशी।
दृढभाव धरुनिया, नामाचा जप करी ॥ २ ॥

काम क्रोध त्यजुनिया, मदमत्सर जाळूनिया ।
भक्तीभाव हृदयी धरूनी, सत्य कर्म करी ॥ ३ ॥
छळ कपट ठेउनी मनी, नाम जपी जो प्राणी ।
मिळे त्यासी नर्क योनी, चौऱ्यांशीची फेरी ॥ ४ ॥
जैराम म्हणे सोडा संशय, नाम घेऊनी काळामय ।
गुरुशरण जाऊनिया, त्याला तू विचारी ॥ ५ ॥

भजन ९२ (चाल– प्रभु हा खेळ दुनियेचा)

उशीर कां लावशी रामा, चैन न आमुचे मना ।
ऐक तूं कानी घे करुणा, येऊनी दे तू सांत्वना ॥ध्रु०॥
तुझ्या वाचुनी या जगी, दिसेना कुणी, आम्हाला तारण्या ।
दुःखे हे दास पोटाचे । कुणाचे कुणी ऐकेना ॥ १ ॥
झाले हे मायेचे वेडे, टाकीतो खोटे हे जाळे ।
विसरुनी अपुले स्वहित, दाविती अपुले थोरपणा ॥ २ ॥
अशा ह्या जनापासूनी, त्रास होई बहु जीवा ।
क्षीण ही झाली बा काया, अश्रु वाहे सदा नयना ॥ ३ ॥
म्हणे जैराम कुठवरी, मनासी धैर्यता यावी ।
झडकरी येऊनी आता, दूरकर माझी ही दैना ॥ ४ ॥

भजन ९३ (चाल–जा के मथुरा में कान्हा ने गागरी फोडी)

नाच नाचूनी भजन करीन, पाहीन पंढरीचा राणा ॥ध्रु०॥
सोडुनिया लाज सारी, जाई त्याचे महाद्वारी ।
डोळे भरून पाहीन, नैना पंढरीचा राणा ॥ १ ॥
घेऊनी हाती विणा टाळ, गळा घाली तुळसी माळ ।
भाळी लावून चंदना ॥ २ ॥

होउनिया त्यांचा किंकर, धरणे धरुनी बसीन दारी ।
देव दर्शना ॥ ३ ॥
आवडतसे मला हेच, जन्मो जन्मी त्यांचा वास ।
जैराम म्हणे नाम गर्जना, करीन मी नाम गर्जना ॥ ४ ॥

भजन ९४ (चाल–प्रभु हा खेळ दुनियेचा...)

दीनाचा तूं रे कैवारी, कसा तूं अंत पाहतोसी ।
कसी रे तुज दया नाही, ठेवी तूं लाज भक्ताची ॥ धृ० ॥
दयाळू हे तुझे नांव, दुःखाचे का बरे ओझे ।
कसी ना ये तुला करुणा, सुखी करी दीन दुबळयासी ॥ १ ॥
किती पतितांचा तूं उद्धार, क्षणामधे तूंच रे केला ।
येउनी तूं दे सांत्वना, दीन या दुबळया बाळासी ॥ २ ॥
पहावे जिकडे तिकडे ही, पसरली काळीमा जगी ।
चिंतातूर होउनी सारे, फिरती चहु दिशांसी ॥ ३ ॥
म्हणे जैराम झडकरी, घेउनी ये गरूड स्वारी ।
नको पाहु रे तूं अंत, जागा दे आपल्या चरणी ॥ ४ ॥

भजन ९५ ( चाल–उद्धरी गुरुराया )

पोटासाठी कसे व्यवहार करता खोटे फार ॥ धृ० ॥
दगडाचे देव करुनी मनी ठेवता भाव ।
तेही सर्व तुझे आहे खरे, परी केला न विचार ॥ १ ॥
दुसऱ्या जीवाची तुजला, मनी नाही मुळी कीव ।
पडला भ्रांतीत भुलूनी, पाठी लागे येर झार ॥ २ ॥
करुनी नवस पुत्रासाठी प्रसन्न करी देव ।
कापी तो जीव स्वार्थासाठी झालासे निष्ठूर ॥ ३ ॥

जैरामदास म्हणे, विसरला आपले तू स्वहीत।
ओळखीले नाही परमात्मा, जीव केला जरजर ॥ ४ ॥

भजन ९६ (चाल-देवळातल्या देवा याहो उतरा ही पायरी)

भाव मनाचा निर्मळ करा, पाहण्या त्या श्रीधरा।
चुकवा जन्माचा फेरा ॥ धृ० ॥
धरुनी दृढभाव अन्तरी, नाव जपावे वेळोवेळी।
विसरुनी सारे देह अभीमान, भावभक्तीची एकी करा ॥ १ ॥
तन मन धन देवाशी अर्पुनी, भजन करावे द्वेष सोडूनी।
मनी नसावा विषय छंद, मिळण्या त्या ईश्वरा ॥ २ ॥
कर्म ज्ञान भक्तीयोग, या तिन्हीची बांधा सांगड।
घालुनिया पद्मासन, सोहंम मंत्र उच्चारा ॥ ३ ॥
जैराम म्हणे ब्रह्मलिन व्हावे, तेव्हा देवा आळवावे।
विसरु नये सत्य कामा, असा मार्ग नेहमी धरा ॥ ४ ॥

भजन ९७ (चाल-उद्धरी गुरुराया)

अंधेर अंधेर पसरला, आहे चहू बाजूला ॥ धृ० ॥
कळेना मार्ग कुणाला, मानव दानव झाला।
निती धर्म गेला, विसरला अपुल्या सत्य कर्माला ॥ १ ॥
द्वेष चहूकडे हा भरला, वनवा हा लागला।
कुणी कुणाचे ऐकेना, दया धर्म बुडाला ॥ २ ॥
चितातुर झाले हे जन, नाही शांती मन।
फिरे सैरावैरा होऊन, भुलला तो हिताला ॥ ३ ॥
चालले जरी ऐसे पुढे होईल बारे मग ते कैसे।
संकट बहु मोठे मज वाटे, जीव पडती हानीला ॥ ४ ॥

जैरामदास म्हणे, प्रेमाला हृदयी धरूनी चाला ।
तेव्हा होई भला विसरू नका, हरीच्या त्या नामाला ।। ५ ।।

भजन ९८ (चाल–हो राम नाम नौका भवसागरी तराया)

हा मानवाचा जन्म, पाहण्याशी देवराया ।। धृ० ।।
आला तू सत्य कामा, जावू न देशी वाया ।
खोवू नको ही संधी, पुढे दुःख हे भोगाया ।। १ ।।
विचार क्षणोक्षणी, करूनी चास वारे ।
राम नाम घेई वाचे, भवसागरी तराया ।। २ ।।
सर्व गुण तुझेपाशी, जसे भाव तू ठेवीशी ।
जसे कर्म तू करीशी, जाशील त्याच ठाया ।। ३ ।।
सत्युग त्रेता द्वापर, कल्युग उभा आहे ।
सर्वांत सर्व प्राणी, कर्मा अपुले कराया ।। ४ ।।
सत्संगाविण जीवा, नाही मुळीच थारा ।
जैराम म्हणे झडकरी, शरणी जा गुरुराया ।। ५ ।।

भजन ९९ (चाल–व्रज के नंदलाला राधाके साँवरिया)

देवाचे नाव घेता कधी ना लाजावे ।
अहर्निशी हरिनामी, तल्लीन व्हावे ।। धृ० ।।
कलियुगी उद्धार असें हरिनामे ।
जपतप यज्ञ हे कुणासी न बने ।।
पूजा अर्चना कोणाशी न होवे, ।
हरि नामाशी भुलले सर्वे ।। १ ।।

सर्वांची इच्छाही पोट कसे भरावे ।
जाळे टाकूनी जना कैसे लुबाडावे ॥
हेच असे त्याचे नेहमीचे चाळे ।
खोट्यानाट्या कामात, आनंद मानावे ॥ २ ॥

हल्लीच्या युगात चालली अशी रीत ।
स्वार्थ साधण्यापूर्ति, लावती हे प्रीत ॥
दारू, गांजा पिऊनी बसती भजनात ।
चुकी स्वत: करी देव दोषी ठहरावे ॥ ३ ॥

जैराम म्हणे मन निर्मल बनवावे ।
मग देवाला तुम्ही नित्य आळवावे ॥
दृढ धरूनी भाव हरीशी भजावे ।
त्याने या देही, देव पाहावे ॥ ४ ॥

भजन १०० (चाल—गेला हरि कुण्या गावा)

सोडूनी लाज शरम सारी, जावे तुम्ही देवाचे द्वारी ।
मनाला शांति मिळे खरी, पाहुनि त्याला ॥ ध्रु. ॥
सूटे विषयाचा छंद । मनाला होतसे आनन्द ।
गगनी टाळ--विणा नाद । ऐकुनि जीव, जीव दंग झाला ॥१ ॥
वासना ओढील ही मुरली । ठाई बुद्धि स्थिरावली ।
काम क्रोधाची होळी झाली । घेउनिया, घेउनि सतसंगा ॥ २ ॥
चिन्ता चितवनि जळले । गुरुचे पाय ज्याने धरिले ।
स्वस्वरूपी मग्न झाले । मिळूनी, मिळूनि त्या पदाला ॥ ३ ॥
जैराम म्हणे जावुनिया, अनुभव नित्य तुम्ही घ्यावा ।
पाहूण्या त्यारे विठ्ठला, मिळेना पुढे संधि तुला ॥ ४ ॥

भजन १०१ (चाल -जाऊ तोरे चरण ...)

राग भूपाळी

कोण कुणाचे दुःख हरतो ।
ज्याचे तो कर्म फल भोगतो ॥ टे. ॥
साधुसंत हे मार्ग दर्शविति ।
जन्म मृत्युच्या विरहित करती ।
विश्वव्यापी प्रभू एक बघतो ॥ १ ॥
कर्ता असूनि अकर्ता राही ।
ऐसे गीता देतसे ग्वाही ।
अविनाशी साक्ष रूप राहातो ॥ २ ॥
वर्म चुकती मूर्ख अडाणी ।
भोगती चौराशींच्या खाणी ।
कैवल्यात बासुरी वाजवितो ॥ ३ ॥
ज्याचे पदरी पूर्व पुण्य ।
त्याला घडते आत्मदर्शन ।
जैराम म्हणे का भुलतो ॥ ४ ॥

भजन १०२ (चाल--आज शाम मोहलिनो बांसुरी बजाईके)

कागदाचा घोडा करूनी, स्वर्गी कोणी गेला का ।
वाचेने ब्रह्मज्ञान सांगुनी, जीव मुक्त झाला का ॥धृ०॥
आळसात बसूनी कधी, पोट त्याचे भरेल का ।
स्वप्नामध्ये हुंडा मिळाला, तो कामी येईल का ॥ १ ॥
गारुड्याने पेढे केले, त्याने पोट भरेल का ।
समोर साखर ठेवीली जरी, चवीवीण कळेल का ॥ २ ॥

गर्भवतीचे सुख दुःख, निपुत्रीस कळेल का ।
कामी पुरुष पुजेस बसला, त्याला शांती मिळेल का ।। ३ ।।
सर्पाला दूध पाजिले, त्याचे अमृत होईल का ।
निंदकाशी मैत्री केली, त्याचे सुख मिळेल का ।। ४ ।।
जैरामदास म्हणे आचारावीण, उपयोगात आले का ।
अनुभवावीण त्याला आत्म खूण कळेल का ।। ५ ।।

---

# आरती

(चाल–चद्दरी गुरुराया)

आरती गणराया, तव पाया, हा जडजीव तराया ॥धृ०॥

जड जीव ताराया, अवतरला, ताराया पतीताला दर्शनःदेण्याला।
शेगांवी, आलासी गणराया ॥ १ ॥ आरती...

थोरवी तुझ्या लिलेची, बुद्धी चाले ना कुणाची,
वाणी ही थकली वेदाची।
वर्णु कसा मी वाची ॥ २ ॥ आरती...

कोरड्या विहीरीत, भरपूर पाणी केले त्यांत, मिटविली भ्रांती।
भास्करा लागे तव तो पाया ॥ ३ ॥ आरती...

तुझीया चिलमीशी, विस्तव नादे बा तो तुजशी चिचवणीमध्ये।
किडे पडले, अशी तुझी ती माया ॥ ४ ॥ आरती...

अपार तुझी लिला, वर्णाया बुद्धी नाही गुरुराया, जैरामदास म्हणे।
पामरा ठेवा आपुली छाया ॥ ५ ॥ आरती...